१९२८

म. ग्रं. सं. ठाणे
विषय चारित्र
सं. क्र. १५९

REFBK-0003318



श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

## चरित्र व वाङ्मय-परिचय.

लेखक

**गंगाधर देवराव खानोलकर.**

प्रस्तावना-लेखक

**प्रो. लक्ष्मण गणेश लेले,**
**न्यू पूना कॉलेज, पुणें.**

REFBK-0003318

**विश्वनाथ गणेश आणि मंडळी,**
**पुणें.**

१९२७.] सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. [ किंमत ८ आणे.

स्वर्गस्थ

मातेच्या

पूज्य चरणीं

अर्पण

# थोडेंसें आधीं

प्रस्तुत चरित्र म्हणजे विलक्षण योगायोगानें घडलेली एक गोष्ट आहे. कोणत्याहि तऱ्हेचा पूर्वसंकल्प नसतां तें अनपेक्षितपणें हातीं घेण्यांत आलें. याला, यंदांच्या साहित्यसम्मेलनाचे दोघे उत्साही चिटणीस रा. रा. शं. के. कानेटकर व रा. रा. वि. ग. ताम्हणकर हे बऱ्याच अंशानें कारण आहेत. त्यांनीं माझ्यामागें लकडा लावला नसता तर हें चरित्र माझ्या हातून लिहिलें गेलें असतें, असें मला वाटत नाहीं. वास्तविक हें चरित्र गुरुवर्य कोल्हटकरांच्या एखाद्या समकालीन विद्वान लेखकानें लिहावयास घेतलें पाहिजे होतें. पण त्यांच्यांत तत्संबंधींची तितकीशी आस्था दिसत नाहीं. मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांकरितां निवडलेल्या मराठी वेंच्यांना जोडलेलें चार ओळींचें त्रोटक चरित्रसुद्धां, काळजीपूर्वक लिहिण्याची जेथें आवश्यकता वाटत नाहीं, तेथें विस्तृत चरित्राची अपेक्षा करणें, म्हणजे कचेरींतील खर्डे एकत्र जुळविणाऱ्याकडून उत्कृष्ट ग्रंथलेखनाची अपेक्षा करण्यासारखें आहे. परवांच १९२८ सालच्या मॅट्रिकच्या परीक्षेकरितां लावलेलें, मराठी निवडक वेंच्यांचें पुस्तक माझ्या पाहण्यांत आलें. या पुस्तकांत कोल्हटकरांच्या ‘ श्यामसुंदर ’ कादंबरींतून एक उतारा घेतला असून, शेवटीं पांच सहा ओळींचें एक त्रोटक चरित्र जोडण्यांत आलें आहे. यांतील पहिलीच ओळ पुढीलप्रमाणें आहेः—‘ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे **खानदेशांत** वकिली करीत असतात.’ किती विलक्षण आस्थेवाईकपणा हा ! विद्यार्थ्यांना अचूक माहिती देण्याची केवढी तत्परता ही ! !

गु. कोल्हटकरांच्या चरित्रविषयक माहितींत वरील संग्राहकानेंच चूक केली आहे असें नाहीं, तर आजवर ज्यांनीं ज्यांनीं त्यांचीं त्रोटक चरित्रें लिहिलीं, त्यांनीं त्यांनीं त्यांच्यावरहि कित्येकदां मात केली आहे. ही अनवस्था आपल्या मगदुराप्रमाणें थोडीबहुत टाळतां येत असल्यास टाळावी, हा या चरित्रलेखनाचा मुख्य हेतु आहे. तो कितपत साध्य झाला, हें वाचकांनींच पहावयाचें आहे. मर्यादित कालांत व पृष्ठांत जेवढ्या गोष्टी लिहितां येणें शक्य होत्या, तेवढ्या लिहिल्या आहेत. अधिक लिहिण्याचा हेतु होता पण मर्यादा ओलांडतां येणें शक्य नव्हतें. कधीं काळीं विस्तृत चरित्र लिहिण्याचा योग आला तर या लिहावयाच्या राहिलेल्या सर्व गोष्टी त्यांत लिहीन.

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं—आपलीं कामें बाजूला सारून—अल्पावकाशांत प्रस्तावना लिहून देऊन मला उपकृत केलें आहे. तसेंच कर्नाटक छापखान्याचे मालक रा. रा. मंगेशराव कुळकर्णी यांनीं या पुस्तकाच्या छपाईच्या बाबतींत आपुलकीच्या भावानें जशी काळजी घ्यावी तशी घेतली आहे. याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. पुस्तकाच्या आरंभीं दिलेल्या गुरुवर्यांच्या शीर्षचित्राचा ब्लॉक वापरावयास दिल्याबद्दल, येथील रामदास प्रिंटिंग प्रेसचे मालक रा. नरहरपंत जोशी यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

मुंबई,<br>ता. १५–मे–१९२७. } **गं. दे. खानोलकर.**

# प्रस्तावना.

( लेखक—प्रो. **लक्ष्मणशास्त्री लेले.** )

येत्या रविवारीं पुणें शहरांत महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या बाराव्या अधिवेशनास आरंभ होणार आहे. त्याचें अध्यक्षपद सुप्रसिद्ध विद्वान् विनोदी नाट्यपंडित रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांस देण्याचें ठरलें आहे. तपोवृद्ध व वयोवृद्ध सरस्वतीचे कण्ठमणि प्रो० शिवराम महादेव परांजपे किंवा महादेव हरि मोडक यांच्या सारख्यांस अध्यक्ष केलें असतें तर ज्येष्ठपणाचा मान राखला गेला असता असा ध्वनि कोठें कोठें कानावर येतो. तथापि झालेली निवड सर्वांस मान्य असल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. राजकीय बाबतींत राष्ट्रीय सभेचें अध्यक्षत्व हा जनतेच्या हातांत असलेला सर्वांत मोठा मान समजला जातो; त्याप्रमाणें साहित्याच्या क्षेत्रांत साहित्यभक्तांच्या हातांतील उच्चतम मान म्हणजे साहित्य-परिषदेचें अध्यक्षपद होय. हा मान यंदा श्रीपाद कृष्ण यांस देऊन महाराष्ट्रानें आपली गुणग्राहकता व्यक्त केली आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. या प्रसंगाला उचित असें एक काम रा. खानोलकर यांनीं केलें आहे. त्यांनीं प्रस्तुतचा 'श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, चरित्र व वाङ्मयपरिचय' या नांवाचा लहानसा निबंध लिहिला व विश्वनाथ गणेश आणि कंपनीनें तो प्रकाशित केला. या निबंधाला लहानशी प्रस्तावना लिहिण्याविषयीं प्रकाशकांनीं आम्हांस विनंति केली. रा. कोल्हटकर यांच्याविषयींचा आमच्या मनांतील आदर आम्हीं खाजगी रीतीनें अनेक प्रसंगीं व्यक्त केला आहे. पण तो जाहीर रीतीनें प्रदर्शित करण्याची संधि आतांपर्यंत आम्हांस मिळाली नव्हती. म्हणून अनायासें आलेली प्रस्तुतची संधि साधून प्रकाशकांची विनंति, प्रस्तावना लिहिण्यास फारच अल्प अवधि असतांही, आम्हीं मान्य केली.

अगदीं आरंभीं एक गोष्ट आम्हांस एकदम सांगून टाकावीशी वाटते. ती ही कीं रा. खानोलकर यांनीं मार्मिकपणानें व सहृदयतेनें लिहिलेला प्रस्तुतचा लेख आम्हांस फार आवडला. हा निबंध लहान आहे, तथापि त्यांत रा. कोल्हटकर यांचा जीवनवृत्तांत व वाङ्मय-कार्य यांचा सारांशानें सुंदर व सर्वांगीण परामर्ष घेतला आहे. हा लेख वाचून वाचकांस रा. कोल्हटकर यांजविषयींची योग्य कल्पना आल्याशिवाय राहणार नाहीं. रा. खानोलकर श्रीपाद कृष्णांशीं अगदीं समरस झाले आहेत, त्यामुळें हा निबंध मधुर व चित्ताकर्षक वठला आहे.

रा. खानोलकरांनीं रा. कोल्हटकरांचा पूर्ववृत्तांत दिला आहे, त्यांत रा. कोल्हटकरांच्या भावी मोठेपणाचीं बीजें विखुरलीं आहेत. समर्थांच्या आनंदभुवनांतून भवभूतिसारख्या महाकवीस प्रसवणाऱ्या विदर्भभूमींत रहावयास गेलेलें कोल्हटकर-कुल अनेक गुणांनीं मंडित असून विश्रुत आहे. महादेवशास्त्री कोल्हटकरांचें वक्तृत्व व अथेल्लोसारख्या अप्रतिम नाटकाचें त्यांचें नांवाजलेलें भाषांतर विष्णुशास्त्री चिपळुणकर या रसिकश्रेष्ठास मान्य झालेलें आहे. रा. ब. वामनराव कोल्हटकर थोर मनाचे समाजसुधारक होते. स्त्रीशिक्षण आणि पुनर्विवाह यांचा त्यांनीं सक्रिय पुरस्कार केला. त्यांचे चिरंजीव अच्युतराव यांनीं शारदेच्या मंदिरांत चालविलेला स्वैर विहार व विलास महाराष्ट्रास विदित आहे. प्रस्तुत निबंधाला विषयीभूत झालेले, वामनराव कोल्हटकर यांचे पुतणे, रा. श्रीपाद कृष्ण प्रतिभासंपन्न नाट्याचार्य व विनोदी ग्रंथकार या नात्यानें महाराष्ट्रांत प्रतिष्ठा पावले आहेत.

श्रीपाद कृष्णांस लहानपणींच पौराणिक कथा व नाटकें वाचण्याची गोडी लागली. मराठी शाळेंत असतां आपल्या संवगड्यांच्या घरीं त्यांनीं लहान लहान नाट्यप्रयोग करावे व नारायणरावांच्या फार्सासारखे फार्स आपसांत करून पहावे. इंग्रजी शाळेंत असतां त्यांनीं दोन लहान नाटकें रचिलीं. त्यांचें पुष्कळांस कौतुक वाटलें. यापुढें नाटकें पाहण्याचा, वाचण्याचा व लिहिण्याचा श्रीपाद कृष्णांस फारच नाद लागला. बडोद्याचे शंकर मोरो रानडे यांचा नाट्याचार्य म्हणून त्या वेळीं लौकिक होता. श्रीपाद कृष्णांनीं त्यांच्या नाट्यकथार्णवाचें मंथन केलें व नाट्यरचनेच्या कामीं रा. रानडे यांस आदर्श म्हणून पुढें ठेविलें. घरांत वडिलांना संगीताची आवड होती. त्यांनीं आपल्या मुलांना तें शिकविण्याची व्यवस्था केली. यामुळें श्रीपाद कृष्णांस संगीताचा चांगला परिचय झाला. किर्लोसकरांचीं पदें खुद्द वडील आपल्या मुलांकडून दर शनिवारीं पद्धतशीर म्हणवीत. या उत्तेजनामुळें श्रीपाद कृष्णांना संगीताचें मर्म कळूं लागलें. या वेळीं झालेल्या संगीताच्या अभ्यासाचा, पुढील संगीत नाटकें रचण्याच्या कामीं, श्रीपाद कृष्णांस मोठा उपयोग झाला.

हायस्कुलांत असतां विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे धाकटे बंधु लक्ष्मणराव ह्यांचा व श्रीपाद कृष्णांचा गुरुशिष्ययोग आला. श्रीपाद कृष्णांसारख्या बुद्धिमान् व विद्याभिलाषी विद्यार्थ्यांवर लक्ष्मणरावांचें सहजच प्रेम जडलें. चिपळुणकर गुरुजींच्या मार्गदर्शित्वामुळें श्रीपाद कृष्णांस निवडक इंग्रजी व मराठी पुस्तकें वाचण्याची संधि मिळाली. यामुळें इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांत इतर विद्या-

र्थ्यांच्या पेक्षां यांची अधिक तयारी झाली. म्याट्रिकच्या वर्गांत असतां त्यांनीं लिहिलेले इंग्रजी निबंध मि. एटकिन्सन, हेडमास्तर, यांस फार आवडले. याच वर्गांत असतां व्याकरण, कवितारचना व निबंध यांवरील शाळाखात्याच्या परीक्षेंत बसून त्यांनीं सहज पहिलें स्थान मिळविलें व दहा रुपयांची शिष्यवृत्ति संपादन केली! ह्या मराठीच्या परीक्षेला मुख्य परीक्षक रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि हे होते. इ. स. १८८८ सालीं श्रीपाद कृष्ण म्याट्रिकची परीक्षा उतरून पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत प्रविष्ट झाले. बुद्धीची तीव्रता, ज्ञानलालसा, मनाची प्रसन्नता व प्रकृतीचें स्वास्थ्य या सर्व गोष्टींची त्यांस आरंभीं अनुकूलता होती. त्यांत आणखी प्रो. सेल्बी, प्रो. आक्सनूह्याम व डॉक्टर भांडारकर यांच्यासारखे गुरू त्यांना लाभले होते! कॉलेजाचें पहिलें वर्ष त्यांस अत्यंत आनंदाचें गेलें; पण पुढें पायास इसब झाल्यामुळें बी. ए. होईपर्यंत त्यांना फार त्रास झाला. या कॉलेजांत असतां शंकर मोरो रानडे यांचे चिरंजीव रघुनाथ शंकर व प्रस्तुतचे केसरीचे संपादक नरसिंह चिंतामण केळकर यांच्याशीं श्रीपाद कृष्णांचा विशेष स्नेह जुळला. याचें कारण तिघांची रसिकता व मनःप्रवृत्ति एकाच जातीची असावी हें असावें. रघुनाथ शंकर यांच्या ठायीं त्यांच्या वडिलांची रसिकता व विद्वत्ता होती. त्यांच्यासारखा व्यासंगी व वाचनाचा हव्यासी त्या वेळीं साऱ्या डेक्कन कॉलेजमध्यें दुसरा कोणी नव्हता. यांची वाङ्मयाभिरुचि उच्च प्रतीची असे. यांच्या सहवासाचा परिणाम श्रीपाद कृष्णांवर विशेष प्रकारें झाला. त्यांना जी वाङ्मयदृष्टि लाभली ती रघुनाथ शंकर यांजपासून असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाट्यवाङ्मयाकडे श्रीपाद कृष्णांचा मूळपासूनच ओढा होता. त्या विषयाचें त्यांचें वाचन व मनन चालूच होतें. त्यांच्या या वृत्तीला उत्तेजन देणारा एक स्मरणीय प्रसंग कॉलेजमध्यें घडून आला. इ. स. १८९१ सालीं कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग करून दाखविला. तो फार बहारीचा वठला असें म्हणतात. या नाटकांत भविष्णु नाट्याचार्य श्रीपाद कृष्ण शकाराच्या विटाच्या रूपानें अवतीर्ण झाले होते. या भूमिकेंत श्रीपाद कृष्णांचा नाटकी ढंग व रंग रंगभूमीवर अभिव्यक्त झाला. केसरीचे भावी संपादक मदनिकेच्या वेषांत फार गोड दिसले व त्यांनीं रसिक प्रेक्षकांचे कुतूहलोत्फुल्ल कटाक्ष आकृष्ट केले असें सांगतात. या विटमदनिकेची जोडी पुणें येथें इ. स. १९२७ सालीं भरणाऱ्या महाराष्ट्र-साहित्यपरिषदेंत मुख्य सभेचा व स्वागतसभेचा अध्यक्षपणा पटकावील असें कोणाच्या स्वप्नांत तरी येणें शक्य होतें काय

पण स्वप्नांतही न येणाऱ्या गोष्टी केव्हां केव्हां अनुभवसृष्टींत दिसूं लागतात, याचा प्रत्यय येत्या रविवारीं आपणांस घ्यावयाला सांपडेल.

इ. स. १८९१ सालीं बी. ए. झाल्यावर रा. श्रीपाद कृष्ण कायद्याचा अभ्यास करण्याकरितां मुंबईस जाऊन राहिले. टीकालेख व स्वतंत्र नाट्यरचना या विषयांनीं श्रीपाद कृष्णांचें मन वेधून टाकल्यामुळें त्यांच्या कायद्याच्या अभ्यासाची गति फार मंद झाली. ते १८९७ सालीं एल. एल. बी. झाले व वऱ्हाडांत वकिली करूं लागले. मुंबईच्या सहा वर्षांच्या मुक्कामांत 'वीरतनय' हें पहिलें नाटक त्यांनीं १८९४ सालीं लिहिलें. 'विक्रमशशिकला' नाटकावर पहिलाच टीकालेख १८९२ सालीं त्यांनीं लिहिला. त्याला विविधज्ञानविस्तारांत स्थल मिळाल्यामुळें श्रीपाद कृष्णांस मोठें समाधान वाटलें व पुढें आणखी टीकालेख लिहिण्यास त्यांस प्रोत्साहन मिळालें. त्यांनीं १८९३ सालीं 'शापसंभ्रम' नाटकावर सणसणीत टीका केली. पण हिच्यामुळें रा. देवल त्यांचे हाडवैरी बनले! यासंबंधाची हकीकत प्रस्तुत निबंधाच्या सतराव्या पृष्ठावर वाचकांनीं पहावी. ती मोठी मनोरंजक व बोधप्रद आहे. एके प्रसंगीं किर्लोस्कर मंडळीमध्यें रा. देवल, श्रीपाद कृष्ण व इतर मंडळी बसली असतां रा. देवल यांनीं वीरतनयाची निर्भर्त्सना करून श्रीपाद कृष्णांच्या तोंडावर त्यांचा अधिक्षेप केला. श्रीपाद कृष्णांनीं मोठ्या बाणेदारपणानें त्याच क्षणीं देवलांस उत्तर दिलें तें असें—"देवल! बाण, शूद्रक वगैरे सारखे दोस्त माझ्या पाठीशीं नाहींत. **माझी उडी स्वतंत्र आहे!** वीरतनय यशस्वी करून दाखविलें नाहीं, तर कोल्हटकरांच्या कुळांत मी व्यर्थ जन्मलों असें समजेन!" हें तेजस्वीपणाचें उत्तर स्वतंत्र ग्रंथकर्तृत्वाच्या बाण्याच्या श्रीपाद कृष्णांच्या मुखांत फारच खुलून दिसत आहे! यांत त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाच्या मोठेपणाचें बीज आहे.

श्रीपाद कृष्ण वकील आहेत तरी ग्रंथकार याच नात्यानें त्यांचा विशेष लौकिक आहे. आज तीस वर्षें त्यांचा लेखनव्यवसाय चालू आहे. लेखनकलेच्या बहुतेक सर्व शाखा त्यांनीं आक्रमून टाकिल्या आहेत. काव्य, नाटक, कथा, कादंबरी, निबंध, टीका, विनोदलेख या सर्वांत त्यांची गति अकुंठित आहे. कायद्याचा अभ्यास करूं लागल्यापासून ते टीका लेख लिहूं लागले. त्यांच्या लेखांत उत्तरोत्तर भारदस्तपणा व समतोलपणा येत गेला आहे.

विचारांची स्वतंत्रता, विनोदपरता, कल्पनेची रमणीयता व चमत्कृतिजनक कोटिक्रम या चार गोष्टी श्रीपाद कृष्णांच्या कोणत्याही कृतींत कमी जास्त प्रमाणांत दिसून येतात. त्यांनीं भाषांतराचें दुय्यम प्रतीचें काम कधीं पतकरिलें नाहीं,

व उष्टया कल्पनांवर निर्वाह केला नाहीं. त्यांचे सुदाम्याचे पोहे तर विनोदाकरितांच प्रसिद्ध आहेत. हा विनोदाचा प्रकार केवळ अपूर्व आहे. संस्कृत नाटकांत व त्यावरून उतरलेल्या मराठी नाटक ग्रंथांतून उत्तम विनोदाचीं स्थळें फार विरळ आहेत. विष्णुशास्त्री चिपळुणकर व आगरकर यांच्या लेखांत विनोद क्वचित् प्रसंगीं दृग्गोचर होतो. परंतु मराठी वाङ्मयांतील बहारीच्या विनोदाचें दालन श्रीपाद कृष्णांच्या कृतीनेंच प्रथम विशेष रीतीनें मंडित केलें. सुदाम्याच्या पोह्यांत कित्येक ठिकाणीं कांहीं धार्मिक गोष्टींची टवाळी केल्याचा भास होतो. धर्मासारख्या गंभीर विषयावर विनोदाचें शस्त्र कुशलपणें चालविण्याला जी कोमल, प्रेमळ व भाविक वृत्ति लागते ती श्रीपाद कृष्ण यांमध्यें नाहीं असा प्रवाद ऐकूं येतो.

श्रीपाद कृष्णांची कोणतीही वाङ्मयकृति घ्या ती सहेतुक असावयाचीच. कोल्हटकरांचें घराणें सुधारणाप्रिय अर्थात् सामाजिक बाबतींत प्रागतिक आहे. मागें लिहिलेंच आहे कीं वामनराव कोल्हटकर हे सुप्रसिद्ध सुधारक होते व स्त्रीशिक्षण आणि पुनर्विवाह यांचे ते क्रियावान् पुरस्कर्ते होते. त्यांच्या कर्तृत्वाची छाप पुतण्यावर पडली असल्यास नवल नाहीं. शिवाय रा. ब. रानडे व रा. आगरकर यांच्या सामाजिक मतांचा पगडा श्रीपाद कृष्णांवर पडलेला दिसतो. त्यांच्या बहुतेक नाटकांतून, कादंबऱ्यांतून, काव्यांतून व इतर टीकात्मक लेखांतून स्त्रीशिक्षण, विधवावपन, जातिभेद, पुनर्विवाह, स्त्रियांचे हक्क, मिश्रविवाह, अस्पृश्य वर्ग इत्यादि विषय प्रमुखत्वानें आले आहेत. सामाजिक अन्यायांची त्यांना फार चीड होती. त्यांवर त्यांनीं आपली तीव्र व प्रभावशालिनी लेखणी कुशलतेनें चालविली आहे. या बाबतींत त्यांचा ' हिंदु धर्म व सुधारणा ' यावरील हल्ला पहा. आगरकरांचे सामाजिक विषयांवरील निबंध उत्कृष्ट आहेत. तथापि त्यांचा प्रसार समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत झाला नाहीं. नाटकें व कादंबऱ्या सामान्य जनास निबंधापेक्षां अधिक मनोरंजक व म्हणूनच प्रिय होतात. श्रीपाद कृष्णांनीं हें मर्म ओळखलें, आणि म्हणूनच नाट्य व कादंबरी यांच्या द्वारा किंबहुना काव्याच्या साधनानेंही सामाजिक मतांचा प्रसार केला व लोकांना विचार करावयाला लाविलें. मतिविकार, गुप्तमंजूष वगैरे नाटकांत निरनिराळीं समाजचित्रें रेखाटलीं आहेत. रा. हरिभाऊ आपटे यांनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्यांनीं जें कार्य केलें तेंच श्रीपाद कृष्णांनीं पूर्वोक्त वाङ्मयद्वारा केलें. हरिभाऊ व श्रीपाद कृष्ण हे दोघेही कट्टे समाजसुधारणावादी. सामाजिक सुधारणांचा विचार व उच्चार दोघांनीं मनापासून केला आहे. तथापि सामाजिक सुधारणेच्या प्रत्यक्ष आखाड्यांत पडण्याचें धैर्य हरिभाऊंना नव्हतें. व तसलें धैर्य कसोटीस लागण्याचा प्रसंगच सुदैवानें श्रीपाद कृष्णांवर आला नाहीं ! तथापि विचार व उच्चार यांच्या साह्यानें वरील दोन्ही गृहस्थांनीं समाजसुधारणेसंबंधानें मोठीच कामगिरी बजाविली आहे यांत संशय नाहीं.

श्रीपाद कृष्णांच्या सर्व नाटकांत मूकनायक नाटक आम्हांस अत्यंत प्रिय आहे. त्यांत मद्यपानाचे अनिष्ट परिणाम दर्शविले आहेत. यांतील जोडसंविधानक सुश्लिष्ट, कल्पना सुंदर, कथानकाचीं अंगें व प्रसंग आकर्षक व भाषेचें प्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे. यांत कोल्हटकरांचे सर्व गुण समुच्चयानें प्रकट झाले आहेत. यांत शृंगाररसाचा उत्कर्ष आहे. त्यांत कवीचा हातखंडा आहे. वीरतन-यांत कवीनें वीराचाही परिपोष केला आहे. अन्यत्र करुण, वत्सल व अद्भुत यांची लकेर मारते. हास्यरस तर कवीचा सहावा प्राण आहे. या कवीचें शिवपावित्र्य हें एकच नाटक ऐतिहासिक आहे. ‘ दुहेरी कीं दुटप्पी’ या त्याच्या कादंबरींत मात्र थोडें राजकारणाचें विवरण आहे. कवीचें लक्ष्य विशेषेंकरून समाजस्थितीकडेसच आहे. कवि सौंदर्याचे परम भक्त आहेत. त्यांची प्रतिभा ज्या ज्या वस्तूवर पडली ती ती उज्वल व रमणीय दिसूं लागली आहे. कवीचें गद्य सर्वत्र सुंदर, ठसठसीत व मनोवेधक आहे. त्याचीं पद्यें मात्र तशीं नाहींत. त्यांतील कल्पना सुंदर असूनही कवीच्या यमकप्रियतेमुळेंच दुर्बोध रचनेच्या योगानें, उठावदार दिसत नाहींत. पूर्ण चंद्रबिंब मेघाच्छादित होऊन जसें अस्पष्ट व असुंदर दिसावें तशी क्लिष्ट रच-नेच्या नेपथ्याच्या आड त्यांच्या कवितासौंदर्याची स्थिति होते ! यास अपवादक कांहीं स्थलं आहेत व त्यांचा निर्देश रा. खानोलकर यांनीं केला आहे. उत्तान शृंगाराकडे केव्हां केव्हां कवीची अनावर प्रवृत्ति होते. यामुळें त्यांचा काव्यचंद्रमा कलंकित होतो.

श्रीपाद कृष्णांचे टीकात्मक व चर्चात्मक लेख विस्तृत व विविध आहेत. याची कल्पना प्रस्तुत पुस्तकाच्या शेवटीं दिलेल्या यादीवरून सहज करितां येईल. हे लेख बहुतेक वाङ्मयात्मक आहेत. श्रीपाद कृष्णांच्या वाङ्मय लेखांत देखील त्यांची तर्कशुद्ध विचारसरणी प्रत्ययाला येते. श्रीपाद कृष्णांनीं ज्योतिष ग्रंथहि लिहिला आहे. यांतही त्यांची भेदक बुद्धि अनिरुद्ध संचार करिते. श्रीपाद कृष्णांच्या दृष्टीला व बुद्धीला अगम्य व अतर्क्य असा विषय सांपडणें कठीणच. काव्याला लागणारी प्रतिभा व शास्त्रीय विषयाला लागणारी तर्कशुद्ध दृष्टि या दोन्ही त्यांच्या पुढें नम्रपणें सेवेला हजर आहेत. तथापि त्यांच्या कोणत्याही लेखावर प्रायः काव्यप्रतिभेचाच शिक्का बसलेला आहे.

अशा प्रकारच्या प्रतिभावान् ग्रंथकाराचें चरित्र व वाङ्मय यावर रा. खानोल-कर यांनीं हल्लींचा योग्य प्रसंग पाहून निबंध लिहिला याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करितों. या प्रयत्नामुळें आम्हांलाही श्रीपाद कृष्णांसंबंधानें आपला आदर जाहीर रीतीनें प्रकट करण्याची गोड संधि अनायासें लाभली ! श्रीपाद कृष्ण यांना परमेश्वर दीर्घायु करो, व त्यांच्या हातून चिरकाल टिकणारी अधिक वाङ्मयसेवा घडो !

४३६३
३५
३५

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

## चरित्र व वाङ्मय-परिचय.

आधुनिक मराठी वाङ्मयक्षेत्रांत ज्यांनीं आपल्या नव्या विचारांच्या, कल्पनांच्या व प्रकारांच्यायोगें विलक्षण क्रांति घडवून आणून, आशापूर्ण अशा नव्या युगाला सुरुवात केली, मराठी वाङ्मयाच्या कपाळीं आलेलें लाजिरवाणें परभृतत्व ज्यांनीं आपल्या तेजस्वी बुद्धिमत्तेच्या योगें नष्ट केलें, मराठी भाषेच्या अंगीं, जगांतील इतर वैभवशाली भाषांप्रमाणें वाटेल ते विचार व भावना यथातथ्य प्रगट करण्याचें सामर्थ्य पुरेपूर आहे असें ज्यांनीं पटवून दिलें, अशा वाङ्मयकार महात्म्यांत **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** यांची प्रामुख्यानें गणना करण्यांत येते. विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या बरोबरीनें साहित्यसम्राट् अशी पदवी दिली असतां ज्याला अधिक शोभेल, अशी महाराष्ट्रांत जर कोणती अधिकारी व्यक्ति असेल तर ती कोल्हटकर हीच होय. साहित्याचा असा एकही विभाग नाहीं कीं, ज्यांत त्यांची प्रतिभा चमकली नाहीं. काव्य, नाट्य, संगीत, विनोद, टीका, कथा या सर्व प्रमुख विभागांत त्यांनीं आपल्या लेखणीचें अतुल सामर्थ्य प्रगट केलें आहे.

श्रीपाद कृष्णांची आज पन्नाशी उलटून गेली आहे. मनुष्याला दिवसेंदिवस बलहीन, उत्साहहीन करणारें वार्धक्य त्यांच्यावर आपली निष्ठुर सत्ता हळुहळु गाजवूं लागलें आहे. त्यांच्या लेखणींतून इतउत्तर नव्या कृती बाहेर पडतील कीं नाहीं, याबद्दल त्यांच्या वाचकांची मनें साशंक होऊं लागलीं आहेत. त्यांच्या मुलुखगिरीचे दिवस आतां संपले असून, त्यांचें महत्व समजून घेण्याचे दिवस आतां आले आहेत. नव्या पिढीला त्यांच्या या मुलुखगिऱ्यांची तितकीशी जाणीव नाहीं. कोल्हटकर हें नांव उच्चारतांच ‘ विनोद ’ हा त्र्यक्षरी शब्द त्यांच्या डोळ्यांसमोर जसा चटकन् उभा राहतो, तसे टीका, नाटक, काव्य, कथा हे शब्द उभे राहत नाहींत. याचें कारण त्या त्या क्षेत्रांतील त्यांच्या कृतीचें तितकेंसें आस्थापूर्वक अध्ययन नव्या पिढीकडून केलें जात नाहीं हें होय. वास्तविक ते जसे महाराष्ट्राचे मूर्धाभिषिक्त विनोदी लेखक आहेत, तसेच ते मूर्धाभिषिक्त नाटककार व टीकाकारहि आहेत. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांचें नांव वगळल्यास त्यांच्याएवढा अष्टपैलु

बुद्धीचा लेखक महाराष्ट्रांत सांपडणें नाहीं. अशा या थोर लेखकाचें चरित्र व त्यानें बजाविलेली कामगिरी हीं समजून घेण्याची उत्सुकता कोणाला होणार नाहीं ? ही उत्सुकता अंशतः तरी पूर्ण व्हावी या हेतूनें प्रस्तुत निबंध लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

---

# जीवनवृत्तांत.

## जन्म व कुलकथा.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म २९ जून १८७१ सालीं नागपूर शहरीं झाला. यांच्या पूर्वजांचा मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवरें. शंभर वर्षांपूर्वी यांचे पणजे गोविंदपंत व्यवसायानिमित्त वांईस आले व तेथेंच स्थायिक झाले. यांचे वडील नारायणपंत व आजे विश्वनाथपंत नेवरें गांवचे देसाई होते. गोविंदपंतांना बरेच मुलगे होते. यांपैकीं हरिपंत व महादेवशास्त्री* यांचीं नावें लक्षांत ठेवण्याजोगीं आहेत. साधी व पवित्र रहाणी, प्रेमळ अंतःकरण आणि प्रामाणिकपणा यांबद्दल वांईचे लोक हरिपंतांस फार चाहत. हरिपंतांची आवाजी सुरेल असे असें म्हणतात; त्यामुळें ते अधिकच लोकप्रिय झाले होते. त्यांच्या भजनांत ते जसे तल्लीन होत, तसेच तें ऐकणारे गांवकरीही होत. हरिपंतांना दोन मुलगे. एक श्रीपाद कृष्णांचे वडील कृष्णराव व दुसरे संदेशकर्ते अच्युतराव कोल्हटकर यांचे वडील वामनराव. पुढें महादेवशास्त्री यांना मूल नसल्यामुळें वामनरावांस त्यांस दत्तक देण्यांत आलें. श्रीपाद कृष्णांचें वाङ्मयिक जीवन यशस्वी होण्यास ज्या कांहीं व्यक्तींची सहानुभूति कारण झाली, त्यांपैकीं वामनराव कोल्हटकर हे होत. वामनराव गेल्या पिढींतील एक प्रमुख कर्ते सुधारक होते. हे पुनर्विवाहाचे कट्टे पुरस्कर्ते असून, त्यांनीं स्वतः विधवेशीं पुनर्विवाह केला होता. यांचें सारें आयुष्य सरकारी नोकरींत गेलें असून, ते सेशन जज्जाच्या हुद्यापर्यंत चढले होते.

कृष्णरावांचें मॅट्रीकपर्यंत व वामनरावांचें बी. ए. पर्यंत शिक्षण झालें होतें.

---

* यांनीं अथेल्लो नाटकाचें उत्कृष्ट भाषांतर केलें होतें. हे नावाजलेले वक्ते होते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या वक्तृत्व या निबंधांत त्यांचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे.

नोकरीनिमित्त हे दोघेही वऱ्हाडांत आले व तत्कालीन महत्वाकांक्षेप्रमाणें सरकारी नोकरींत शिरून मोठ्या हुद्यांच्या जागांपर्यंत चढले व तेथेंच स्थायिक झाले.

श्रीपाद कृष्णांचे वडील अत्यंत धार्मिक वृत्तीचे असत. यांना गाण्याची बरीच आवड असे. आपल्या सर्व मुलांना उत्तम गातां यावें अशी यांची फार इच्छा. यांचा स्वभाव तापट पण अत्यंत प्रेमळ असे. असत्य, अप्रामाणिकपणा यांची त्यांना चीड असे.

## बाल्य व विद्यार्थीदशा.

श्रीपाद कृष्णांचें बाळपण बुलढाणा व अकोला येथें गेलें. आई लहानपणींच वारल्यामुळें त्यांना मातृसुख असें फारसें लाभलें नाहीं. त्यांना आपल्या आईची अंधुक अशी आठवण आहे. यांचें नांव सावित्रीबाई असें होतें. या अत्यंत भाबड्या व प्रेमळ अशा होत्या. त्यांच्या डोळ्यांतून पाणी येण्यास थोडेंसें निमित्तसुद्धां पुरे होई.

श्रीपाद कृष्ण मातृसुखाला जरी आंचवले होते, तरी त्यांच्या सावत्र आईनें त्यांची कधीं आबाळ होऊं दिली नाहीं. तिनें त्यांचें प्रेमळपणें संगोपन केलें; त्यांना आईची आठवण कधीं होऊं दिली नाहीं. आपल्या या सावत्र आईच्या प्रेमळपणा-बद्दल श्रीपाद कृष्ण ज्या ज्या वेळीं बोलतात, त्या त्या वेळीं त्यांचा ऊर अभिमा-नानें भरून येत असतो. 'अशी उदार हृदयी स्त्री लाखांत सांपडणें कठीण' असें ते म्हणत असतात. त्यांनीं आपलें '**वीरतनय**' हें पहिलें नाटक यांनाच आदर-पूर्वक अर्पण केलें आहे.

श्रीपाद कृष्णांना त्यांच्या सावत्र आईकडून किंवा इतर कुटुंबांतील मंडळीकडून जरी प्रेमळपणें वागविलें जाई, तरी भोंवतालच्या लोकांकडून त्यांची अवहेलनाच होत असे. त्यांचा तो ओबडधोबड चेहरा, त्यांचें तें कांहींतरी विचित्र बोलणें— ज्या बोलण्यामुळें त्यांचा पुढें 'कोट्याधीश' म्हणून लौकिक झाला—यामुळें शेजाऱ्यापाजाऱ्यांपासून तों दारांतल्या पटेवाल्यापर्यंत सर्वांच्या थट्टेला ते पात्र ठरले. प्रेमाचा ओलावा असा त्यांना कोणाकडून कधीं फारसा लाधला नाहीं. वेडसर, अजागळ या विशेषणांना ते सर्वानुमतें लायक ठरले. याचा परिणाम त्यांच्या बालमनावर जो व्हावयाचा तोच झाला. त्यांची वृत्ति एकांतप्रिय बनली. लोक आपला उपहास करतात, तर आपण त्यांच्यांत कशाला मिसळा, एका बाजूला राहिलें तर काय बिघडलें, अशा तऱ्हेची त्यांची विचारसरणी बनूं लागली. या

विचारसरणीबरोबरच त्यांच्या बालहृदयांत नव्या महत्वाकांक्षेनें प्रवेश केला. ही महत्वाकांक्षा म्हणजे इतर मुलांपेक्षां आपण हुशार आहों, हें सिद्ध करून दाखविणें ही होय. याकरितां त्यांनीं जें पुस्तक हाताला मिळेल तें वाचण्याचा सपाटा लावला. या वेळीं त्यांना त्यांच्या एका लंगोटियाराचा अतिशय उपयोग झाला. या लंगोटियाराचें नांव त्रिंवक शिवराम. याला नाटकें, कादंबऱ्या, पुराणें वाचण्याचा फार नाद असे. वाचलेल्या पुस्तकांतील गोष्टी पदरचें तिखटमीठ लावून तासचेतास चटकदारपणें सांगण्याची कला, याला फार उत्तम साधली होती. या त्याच्या कलेमुळें वर्गांतील मुलांची त्याच्यावर बहाल मर्जी असे. अशीच बहाल मर्जी आपल्यावरहि असावी, या हेतूनें श्रीपाद कृष्णांनीं चुरशीनें वाचावयास सुरवात केली व त्यांत ते त्रिंबक शिवरामाहूनहि अधिक यश संपादन करते झाले. या वेळीं त्यांचें वय सुमारें ६–७ वर्षांचें होतें.

## कलियुगांतील ध्रुव.

याच सुमारास एक मोठी गमतीची गोष्ट घडली. पुराणांतील ध्रुवाची कथा त्यांच्या ऐकण्यांत आली होती. या कथेचा त्यांच्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला होता, कीं आपणहि ध्रुवबाळाप्रमाणें एका पायावर उभें राहून तपश्चर्या करावी व देवाची भेट घ्यावी असें त्यांना वाटूं लागलें होतें. आपल्याच वयाच्या ध्रुवबाळाला एका पायावर उभें राहून, हात जोडून, डोळे मिटून जर देवाला वश करून घेतां येतें, त्याचें प्रेम संपादतां येतें, तर आपल्याला तसें कां करतां येऊं नये? झालें. स्वारी त्या दिवसापासून मुकी बनली. ज्या बाजुला कोणी कधीं फिरकणार नाहीं, अशा एका कोपऱ्यांत ध्रुवाप्रमाणें डोळे मिटून, हात जोडून, एका पायावर निश्चल उभें राहण्याची तपश्चर्या सुरू झाली. पण ती फार दिवस टिकली नाहीं. भोंवतालच्या मंडळीच्या नजरेस तें दृश्य पडतांच, त्यांनीं त्यांची थट्टा कर करून जीव बेजार करून टाकला. ‘ साधुबुवा ’ म्हणून कोणी त्यांच्या पायां पडूं लागले, तर ‘ हा पाहिलात का कलियुगांतील ध्रुव ’ म्हणून कांहीं टवाळकी करूं लागले. या तपश्चर्येनें देव वश झाला नाहींच, उलट घरांतल्या मंडळीची ‘ श्रीपाद खरोखरच बावळट व वेडगळ आहे ’ ही समजूत मात्र दृढ झाली. ही त्यांची समजूत बरेच दिवसपर्यंत कायम होती.

## आपत्तींत आपत्ती.

श्रीपाद कृष्णांना भोंवतालच्या माणसांकडून यत्किंचित्सुद्धां सुख मिळूं द्यावयाचें नाहीं, असा त्यांच्या दैवानें चंगच बांधला होता कीं काय कोण जाणे, त्यानें

त्या आपत्तींत आणखी एका आपत्तीची भर घातली. त्यांना एकाकीं अर्धांगवायूनें झपाटलें. आपल्या बिनतोड कोटिक्रमानें प्रतिपक्षियांची जिव्हा व हस्त लुलीं करणाऱ्या या वाङ्मयवीराची जिव्हा व हस्त हीं या झटक्यानें लुलीं झालीं. यामुळें त्यांच्या बाह्य वेडगळपणांत अधिकच भर पडली; शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या उपहासाचा पारा अधिकच वर चढला. सुदैवानें लवकरच ते या झटक्यापासून मुक्त झाले. या आपत्तींतून सुटका झाल्यावर आपल्या वाचनाचा झपाटा त्यांनीं पूर्ववत् सुरू केला. त्यांना नाटकें पाहण्याचा, वाचण्याचा व करण्याचा अतिशय नाद लागला. आपल्या संवगड्यांच्या घरीं, त्यांचीं वडील माणसें नाहींत अशी संधी पाहून, वर्गांतील मुलें जमवून, ओट्याची रंगभूमी व त्यावर अंथरलेल्या सतरंज्यांचे पडदे करून नाटकें अभिनीत केलीं जात. ‘ नारायणरावाचा फार्स ’ वगैरे सारखीं हीं नाटकें असत.

याच सुमारास त्यांना दत्तक घेण्याचा बळवंतराव कोल्हटकरांचा ( रा. अच्युतराव कोल्हटकर आपल्या नांवामागें ज्यांचें नांव लावतात ते ) विचार ठरत होता. घरांतील मंडळींत तत्संबंधीं बोलणींहि सुरू झालीं होतीं. श्रीपाद कृष्णांना दत्तक जाणें मनापासून आवडत नव्हतें. कोणी त्यांच्यासमोर तशी गोष्ट काढली तर त्यांना अतिशय वाईट वाटे. बळवंतरावांच्या पत्नीचें त्यांच्यावर अतिशय प्रेम असतां व ह्यांचेंहि तिच्यावर तसेंच असतांहि ‘ दत्तक जाणें ’ ही गोष्ट त्यांना पसंत नव्हती. पुढें, श्रीपाद कृष्णांच्या वेडसरपणाच्या हकिगती कानांवर गेल्यामुळें बळवंतरावांनीं त्यांस दत्तक घेण्याचा बेत रद्द केला. यामुळें श्रीपाद कृष्णांना पूर्वीहूनहि अतिशय वाईट वाटलें. दत्तक घेण्याचा बेत इतर कोणत्याहि कारणामुळें रद्द न होतां, लोकांनीं आपल्यावर लादलेल्या वेडसरपणामुळें तो रद्द झाला, ही गोष्ट त्यांच्या मानी बालमनाला अतिशय लागली.

## पहिलें नाटक.

मराठी पांचव्या इयत्तेंत असतां अण्णा किर्लोस्करांचें सं० सौभद्र वाचून आपणहि एक स्वतंत्र नाटक लिहावें, असें श्रीपाद कृष्णांना वाटूं लागलें आणि त्यांनीं तो बेत लगेच अमलांत आणलाहि. या नाटकांत तत्कालीन पद्धतीप्रमाणें कटाव अगदीं खच्चून भरले होते. या वेळीं त्यांचें वय सुमारें बारा वर्षांचें होतें. यानंतर इंग्रजी चौथ्या इयत्तेंत असतां एक तीन अंकी नाटक व पांचव्या इयत्तेंत असतां

'**सुखमालिका**' नांवाचें एक पंचांकी नाटक अशीं दोन नाटकें त्यांनीं सात सात दिवसांत लिहून काढलीं. त्या कालांत **शंकर मोरो रानडे** हे उत्कृष्ट नाटककार व नाट्यकलेचे मर्मज्ञ म्हणून गाजलेले होते. हे गृहस्थ फार थोड्या अवकाशांत नाटक लिहूं शकतात, असा त्यांजविषयीं लौकिक पसरला होता. श्रीपाद कृष्णांची या कालांत रानडे ही ध्येयदेवता बनली होती. त्यांच्या **नाट्यकथार्णवाचे** ते एकांतिक वाचक होते. सात दिवसांत नाटक लिहून काढावयाचें, याच्या मुळाशीं आपण मूर्तिमंत शंकर मोरो रानडे बनावयाचें हीच महत्वाकांक्षा असावी. बालपणीं लिहिलेलीं हीं दोन नाटकें त्यांनीं बरेच दिवसपर्यंत जपून ठेविलीं होतीं. हीं नाटकें ते सहसा कोणाला दाखवीत नसत. एकदां त्यांनीं तीं के० गडकऱ्यांच्या अत्याग्रहामुळें त्यांस पाहण्यास दिलीं होतीं. दुर्दैवानें गडकऱ्यांच्या गबाळेपणामुळें असो किंवा अन्य कांहीं कारणामुळें असो, तीं फिरून कांहीं त्यांच्या हातास लागलीं नाहींत. या दोन नाटकांपैकीं '**सुखमालिका**' नाटक बरेंच चांगलें वठलें होतें म्हणतात. याच्या सुरुवातीला पांच मंगलाचरणें घालण्यांत आलीं असून, त्यांतील एक अण्णा किर्लोस्करांना उद्देशून होतें. श्रीपाद कृष्णांचे चुलते या नाटकावर अगदीं खुश असत. यांतील दोन चार कल्पना त्यांना अतिशय आवडत. यांपैकीं दोन पुढें देत आहें.

" तूं इतका निष्कलंक, मग तुझें चारित्र्य मला इतकें घाणेरडें कां वाटलें ? कदाचित् तुझ्या शुद्ध चारित्र्यरूपी स्वच्छ आरशांत माझ्या घाणेरड्या चारित्र्याचें प्रतिबिंब पडल्यामुळें मला तसें वाटलें असेल. "

याच नाटकांत दुसरे एके ठिकाणीं पुरुषवेषधारिणी सुखमालिका स्वतःच्या विचित्र दैवयोगाबद्दल उद्गार काढते, " संकटरूपी पर्जन्याचा जेव्हां मजवर वर्षाव होऊं लागला त्या वेळीं मी या वृक्षाचा (राजाचा) आश्रय केला, पण आतां पर्जन्य थांबतांच या वाऱ्याच्या झोतानें हालला गेल्यामुळें तोच मजवर पूर्वींहून दुप्पट जोरानें वर्षाव करूं लागला आहे. " या नाटकांतील पदें साधीं, सोपीं पण मधुर अशीं लिहिलीं होतीं. या नाटकाच्या चौथ्या अंकांत राजपुत्र व त्याचे शाळासोबती यांचा एक प्रवेश घातला होता. हा फारच विनोदी झाला होता. '**गुप्तमंजूष**,' '**प्रेमशोधन**' या त्यांच्या पुढील नाटकांत '**सुखमालिकेंतील**' कांहीं कल्पनांचा उपयोग करून घेतलेला आहे. याठिकाणीं एका व्यक्तीचा उल्लेख केल्याविना राहवत नाहीं. ही व्यक्ती म्हणजे अण्णा मास्तर ही होय.

## अण्णा मास्तर

श्रीपाद कृष्ण मराठी चौथ्या इयत्तेंत असतां, अण्णा मास्तर त्याच शाळेंत दुसऱ्या इयत्तेवर शिक्षक होते. पंढरीच्या भावव्या भक्तानें जशा भाविकपणें संत-कथा पाल्हाळपूर्वक पण सुरसतेनें सांगाव्या, तशा हे नाट्यकथा व नटकथा सांगत. आपण कुठल्या तरी नाटक कंपनीचा म्यानेजर होऊन, डोक्याला पागोटें घातलें आहे, अंगांत मलमलीचा शुभ्र सदरा घातला असून, त्यावर गळ्याभोंवतीं अडकवि-लेला खिशांतील घड्याळाचा काळा दोरा रुळत आहे, अशा थाटांत ऐटीनें 'तिकीट प्लीज, तिकीट प्लीज' म्हणत नाटकगृहांत हिंडत आहों, असें दृश्य पहा-वयास मिळावें, अशी त्यांची आयुष्यांतील एक महत्त्वाकांक्षा होती. श्रीपाद कृष्णां-वर त्यांचा अतिशय लोभ असे. यांच्या सहवासांतच त्यांची नाटकाची व संगी-ताची आवड उत्कट बनली. भाऊराव कोल्हटकरांचे हे मोठे भक्त. त्यांच्यासारखी मान वांकडी करून मेंढ घेण्यांत त्यांना एक प्रकारचा अभिमान वाटे. या गृहस्थाची नाट्यकलेवरील भक्ति अखेरपर्यंत टिकली होती. "मी मेल्यावर माझ्या वर्षश्रा-द्धाच्या दिवशीं दुसरें कांहीं करूं नका; एक सुंदर नाटक करून दाखवा म्हणजे माझा आत्मा शांत होईल," असें ते मधून मधून उद्गार काढीत.

अण्णा किर्लोस्करांच्या अवसानानंतर किर्लोस्करानुयायी नांवाची एक संगीत मंडळी निघाली होती. त्यांत काका गोडबोले नांवाचे एक बऱ्यापैकीं नट व गायक होते. श्रीपाद कृष्णांच्या रागदारीच्या ज्ञानाचें बरेंचसें श्रेय यांना आहे. यांच्याच सहवासांत त्यांना गाण्याचा नाद लागला. या नादाला घरींहि अनुकूल असें वाता-वरण सांपडल्यामुळें, त्यांच्यांत त्याची सुंदर व पुढील जीवनाला पोषक अशी अभि-वृद्धि झाली. मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, श्रीपाद कृष्णांच्या वडिलांना गाणें बरेंच आवडे. अकोल्याला किर्लोस्कर नाटक मंडळी आली म्हणजे संगीत प्रयोग पहावयाला ते मुलांना घेऊन जात. हे दिवस म्हणजे किर्लोस्कर नाटक मंडळीच्या वैभवाचे दिवस होते. भाऊराव कोल्हटकर, मोरोबा वाघोलीकर, किंज-वळीकर यांसारखे अप्रतिम गायक नट हिचे मालक होते. हिच्याशीं स्पर्धा करूं शकेल, अशी एकही नाटक कंपनी त्या वेळीं महाराष्ट्रांत नव्हती. तत्कालीन सर्व सुशिक्षित महाराष्ट्रीयांप्रमाणें श्रीपाद कृष्णांच्या वडिलांना या कंपनीबद्दल व तिच्या मालकांबद्दल एक प्रकारचा आपलेपणा वाटे.

## सुवर्णरात्री.

श्रीपाद कृष्णांच्या वडिलांचा बरेच दिवसपर्यंत असा एक क्रम असे, कीं दर शनिवारीं रात्रीं घरांतील सर्व मुलांस एकत्र जमवून त्यांजकडून नाटकांतील पदें म्हणवून घ्यावयाचीं. या रात्रीला **सुवर्णरात्र** ( Golden night ) असें नांव ठेवण्यांत आलें होतें. किर्लोस्कर मंडळींतील प्रमुख प्रमुख गायकनटांचीं पदें एकेकानें वांटून घेऊन, त्यांच्या त्यांच्या आवाजींत तीं म्हणून दाखवावयाचीं हा या रात्रीचा मुख्य कार्यक्रम असे. या जलशांतील मोरोबा वाघोलीकरांचीं पदें म्हणण्याचें काम श्रीपाद कृष्णांवर सोंपविण्यांत आलें होतें. भाऊराव कोल्हटकरांच्या तोंडचीं पदें श्रीपाद कृष्णांचे धाकटे बंधु दिगंबरपंत* म्हणत. भाऊरावांची विवक्षित रीतीनें मेंढ घेण्याची कला यांना उत्तम अवगत झाली होती. सुरेल आवाजी हें कोल्हटकर घराण्याला एक दैवी देणेंच आहे. गाणें येत नाहीं किंवा त्याचा शोक नाहीं असें माणूस त्यांच्यांत सांपडणें विरळा.

## हायस्कुलांतील वाङ्मयव्यासंग.

हायस्कुलांत असतां एका प्रसिद्ध व्यासंगी अध्यापकाच्या सहवासांत राहण्याचें श्रीपाद कृष्णांना भाग्य लाधलें होतें. हे गृहस्थ म्हणजे विष्णुशास्त्री चिपळुणकरांचे बंधू व त्यांचे चरित्रकार कै. **लक्ष्मणराव चिपळुणकर** होत. यांचा श्रीपाद कृष्णांवर अतिशय लोभ होता. यांच्याच प्रेरणेमुळें त्यांनीं पहिल्यानें निबंधमाला व अरेबियन नाइटस् हीं पुस्तकें वाचलीं. अरेबियन नाइटस्च्या वाचनाचा चमत्कृतिपूर्ण कल्पना प्रसवण्याकडे व त्यांचा उत्कृष्ट रीतीनें विकास करण्याकडे बराच उपयोग झाला, असें ते कधींकधीं म्हणतात. आणि ही गोष्टहि त्यांचीं ‘ गुप्तमंजूष, ’ ‘ प्रेमशोधन, ’ हीं नाटकें वाचलीं असतां प्रत्ययाला येते. निबंधमालेचीं तर त्यांनीं पारायणेंचीं पारायणें केलीं होतीं व त्यांतील निबंधांच्या धर्तीवर बरेचसे निबंधहि लिहिले होते. सहाव्या–सातव्या इयत्तेंत असतांना त्यांच्या हातून इंग्रजी वाचनहि बरेंच घडलें. ॲडिसन, गोल्डस्मिथ व स्कॉट हे ग्रंथकार त्यांचे त्या वेळचे जानीदोस्त. स्कॉट तर त्यांना अजूनहि प्रिय आहे. मॅट्रीकचे वर्गांत यांनीं त्यांच्या सर्व वेव्हर्ले कादंबऱ्या मार्मिकपणें वाचून काढल्या होत्या. स्कॉटच्या वाचनानें माणसांमध्यें एकप्रकारचा बाणेदारपणा व स्त्रीदाक्षिण्य हीं येतात, असें त्यांचें मत आहे. या वाच-

* हे सध्यां वऱ्हाडांत सेशन जज्जाच्या हुद्यावर असून, त्यांचा निःपक्षपाती व कर्तव्यतत्पर न्यायाधिश म्हणून लौकिक आहे.

नामुळें ते इतर विद्यार्थ्यांपेक्षां इंग्रजी अधिक सफाईनें लिहूं शकत. त्यांनीं लिहिलेले निबंध त्यांच्या एटकिन्स नांवाच्या प्रिन्सिपॉलला अतिशय आवडत. यामुळें इंग्रजी विषयाला ठेविलेलीं बक्षिसें सहसा त्यांच्या हातून कधीं निसटलीं नाहींत.

## एक संस्मरणीय विजय.

मॅट्रीकचे वर्गांत असतां वडील माणसांचें त्यांच्यावद्दलचें औदासिन्य नाहींसें करून, त्यांच्या उज्वल भविष्यकालाची अंधुक अशी आशा त्यांच्या हृदयांत उत्पन्न करणारी एक महत्वाची गोष्ट घडली. त्या दिवसांत वऱ्हाडप्रांतीय शिक्षणखात्याकडून व्हर्न्याक्युलर एक्झॅमिनेशन नांवाची एक परीक्षा घेतली जाई. व्याकरण, कवितारचना व निबंध असे याचे तीन विभाग असत. या तीनहि विभागांत जो पहिला येई त्या विद्यार्थ्याला दरमहा दहा रुपयेप्रमाणें शिष्यवृत्ती देण्यांत येत असे, निरनिराळ्या शाळांतील हुशार हुशार विद्यार्थी या परीक्षेला वसत. श्रीपाद कृष्णांच्या मनांत आपणही एकदां या परीक्षेला बसून बघावें असें आलें व त्याप्रमाणें ते तयारीलाही लागले. पुष्कळांनीं इतकें वाचावें लागतें, तितकें वाचावें लागतें म्हणून त्यांना भीती घातली होती. पण त्याची यत्किंचितहि फिकीर न बाळगतां ते परीक्षेला बसले व पहिले आले. रा. ब. विष्णू मोरेश्वर महाजनी हे या परीक्षेचे मुख्य परीक्षक होते. या परीक्षतील यशाच्या श्रेयाचा बराचसा वांटा नवनीत व निबंधमाला यांजकडे जातो असें ते म्हणतात. श्रीपाद कृष्णांनीं व्हर्न्याक्युलर परीक्षेंत मिळविलेला हा संस्मरणीय विजय, त्यांच्यांत भावी कर्तबगारीबद्दल एक प्रकारचा दांडगा आत्मविश्वास उत्पन्न करावयाला बराचसा साहाय्यभूत झाला. या वेळीं त्यांचें वय सुमारें सोळा वर्षांचें होतें.

## डेक्कन कॉलेजांत.

१८८८ च्या नोव्हेंबरांत त्यांची मॅट्रीकची परीक्षा उतरली व त्यांनीं उच्च शिक्षणाकरितां डेक्कन कॉलेजांत प्रवेश केला. या सालीं शेक्सपियरचीं नाटकें शिकविण्यांत पटाईत म्हणून प्रसिद्ध असलेले मि. ऑक्सेनहॅम प्रिन्सिपॉल असून, अध्यापक मंडळींत प्रो. सेल्बी, डॉ. भांडारकर वगैरे नामांकित मंडळी होती.

कॉलेजांतील पहिलें वर्ष श्रीपाद कृष्णांना सर्वतोपरी बरें गेलें. सकाळींच आखाड्यांत जाऊन तालीम करावी किंवा पोहावें, संध्याकाळीं लहर लागल्यास बोटींगक्लबमध्यें जाऊन यथेच्छ होडी वल्हवावी, असा बहुधा त्यांचा कार्यक्रम असे. अभ्यास बेताबेतानेंच चालला होता, परंतु प्रकृति मात्र उत्कृष्ट सुधारली. या

वर्षांच्या अखेरी अखेरीस किडा चावल्याचें निमित्त होऊन, त्यांच्या पायाला इसबानें घेरलें. जवळ जवळ दोन वर्षे त्यांना त्यापासून अतिशय त्रास सोसावा लागला. इसब कमी होतो, इतक्यांत मलेरियानें त्यांना घेरलें. अशा परिस्थितींत अभ्यास करणें त्यांना अशक्य होऊन बसलें. तरीपण स्नेही मंडळींतील कांहीं स्नेह्यांच्या चढाओढीला बळी पडून बी. ए. च्या अभ्यासाला त्यांनीं सुरुवात केली. परीक्षेला अवघे चार महिने राहिले होते. दोन वर्षांचा अभ्यास पाव वर्षांत पुरा करावयाचा होता. ते यत्किंचितहि डगमगले नाहींत. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. एवढ्या अल्पकालांतही आपण आपला अभ्यास पुरा करून, परीक्षेंत उत्तीर्ण होऊं असा त्यांस विश्वास वाटत होता. हा विश्वास गैर ठरला नाहीं. १८९१ सालीं ते बी. ए. ची परीक्षा पास झाले.

## कॉलेजांतील स्नेही

कॉलेजांत असतां समान ध्येयें व समान अभिरुची यांमुळें ज्यांच्याशीं त्यांचा स्नेह जुळला अशांपैकीं कै. रघुनाथ शंकर रानडे, रत्नागिरीचे प्रसिद्ध वकील रा. नानल, सावंतवाडी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक कै. वाके व केसरी पत्राचे संपादक रा. नरसिंह चिंतामण केळकर हे होत. त्यांतल्या त्यांत रघुनाथ शंकर व रा. केळकर यांच्यांशीं त्यांचें अधिक रहस्य असे. कै० रघुनाथ शंकर हे प्रसिद्ध शंकर मोरो रानडे यांचे चिरंजीव. यांच्या कलाविषयक व वाङ्मयविषयक अभिरुची उच्च दर्जाच्या होत्या. कॉलेजांतील तत्कालीन विद्यार्थ्यांत त्यांच्याएवढा व्यासंग व वाचनाचा हव्यास असलेला एकही विद्यार्थी नव्हता. वडिलांमधील तीव्र बुद्धिमत्ता यांच्यांत उत्कटत्वानें प्रगट झालेली दिसत असे. श्रीपाद कृष्णांना यांच्या सहवासांत एक नवी वाङ्मयदृष्टि लाधली. त्यांच्या ग्रंथांत रसिक मनाला भारून टाकणारा जो एक विलक्षण ताजेपणा आढळून येतो, तो या दृष्टीचाच परिणाम होय.

## मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग.

१८९१ साल हें डेक्कन कॉलेजाच्या इतिहासांत अभिमानानें नमूद करून ठेवण्यासारखें साल आहे. या सालीं जो मृच्छकटिकाचा प्रयोग झाला, त्या प्रयोगानें डेक्कन कॉलेजचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें. अशा तऱ्हेचा उत्कृष्ट नाट्यप्रयोग महाराष्ट्रीय रंगभूमीवर आजपर्यंत तरी झाला नाहीं, असें म्हणतात. आपल्या कर्तबगारीच्या योगें निरनिराळ्या क्षेत्रांत ज्यांनीं श्रेष्ठ दर्जाची मानमान्यता मिळविली अशा व्यक्तींनीं यांत भूमिका घेतल्या होत्या. जिज्ञासू वाचकांकरितां त्यांची नामावली पुढें देत आहें.

मराठी ग्रंथसंग्रहालय ... ४३ ... मुंबईत.

| नाटकांतील भूमिका. | कोणी घेतली होती. |
|---|---|
| चारुदत्त | मल्हारराव गर्दे. |
| शकार | विष्णुपंत साठे. |
| वसंतसेना. | रा. कट्टी ( यांनींच श्रीपाद कृष्णांना नक्षत्रज्ञान करून दिलें. ) |
| वसंतसेनेचा वीट. | कै. मंगेश शिवाजी तेलंग. |
| शकाराचा वीट. | रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. |
| शर्विलक. | रा. गोविंदराव ओक. |
| भिक्षुक. | रा. श्रीनिवास त्रिंबक द्रवीड (इंदुरचे वकील) |
| मदनिका. } कुंभीलक. } | रा. नरसिंह चिंतामण केळकर. |
| न्यायाधिश. | रा. केसकर ( संतापशमनकर्ते ). |

पडद्यांतील प्रॉम्पटर्सचें काम इतिहाससंशोधक सरदार मेहेंदळे व बॅ. गाडगीळ यांनीं केलें होतें. प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनीं मंगलाचरण रचून दिलें होतें. हे व ना. बेळवी या वेळीं कॉलेजांत फेलो होते.

या नाटकाची सायंत हकिगत ना. बेळवी यांनीं 'टाइम्स ऑफ इंडियामध्यें' पुरोपूर दोन रकाने भरतील एवढी प्रसिद्ध केली होती. यांत श्रीपाद कृष्णांच्या अभिनयाचा वैशिष्ट्येंकरून गौरवपूर्वक उल्लेख केला होता.

## मुंबईत.

बी. ए. पास झाल्यावर श्रीपाद कृष्ण कायद्याच्या अभ्यासाकरितां मुंबईस आले. रा. नानल, रा. केळकर हे त्यांचे स्नेहीही या वेळीं त्यांजबरोबर होते. ही सर्व मंडळी गिरगांवांत डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकरांच्या शेजारीं दिवाडकरांच्या बंगल्यांत रहात असे. या मंडळीची पहिली सहासाही कडाक्याचे वादविवाद करण्यांत, गाण्यावजावण्यांत व नाटकें पहाण्यांतच गेली. या वेळीं श्रीपाद कृष्णांच्या डोक्यांत **वीरतनयाचें** कथानक घोळूं लागलें होतें व त्यांतील पदें तयार करण्याकरितां, पारशी रंगभूमीवर सुरू झालेल्या चालींचा उपयोग कितपत करून घेतां येईल, यासंबंधींचे विचार चालले होते. या सहामाहीच्या अखेरी अखेरीस तीस पदेंहि तयार झालीं.

दुसऱ्या सहामाहींत या लोकांनीं आपलें बिऱ्हाड बदललें व ते शेणव्याच्या वाडींत पालेकरांच्या घरांत राहावयास गेले. श्रीपाद कृष्णांचा विक्रमशशिकला ( १८९२ ) हा पहिला टीकात्मक लेख या ठिकाणीं लिहिला गेला. या लेखांत नाटकाची, नाटककर्त्यांची व त्याच्याच पावलांत पाऊल ठेऊन नाटकें लिहूं पाहणारांची योग्य शब्दांत संभावना केली होती. नवशिक्या लेखकाच्या लिखाणांत आढळून येणारे दोष जरी यांत बऱ्याच प्रमाणांत होते, तरी ज्या दृष्टीनें ही टीका लिहिली गेली होती, ती दृष्टी नवी व अभिनंदनीय अशी होती. आणि यामुळेंच विविधज्ञानविस्तारासारख्या—नवशिक्या लेखकाला सहसा प्रवेश न मिळणाऱ्या—प्रौढ व भारदस्त मासिकांत—टीकाविषयक नाटक भिकार असूनहि—त्याला स्थळ मिळूं शकलें. विस्ताराच्या संपादकाकडून आपल्या लेखाला योग्य स्थळ केराच्या टोपलींतच देण्यांत येणार, असा लेखकाला भरंवसा वाटत होता. तरीपण अंगांत होतें नव्हतें तेवढें धैर्य एकवटून त्यांनीं लेख पाठविण्याचें हें धाडस केलें होतें. बरेच दिवसपर्यंत संपादकाकडून लेखाबद्दल जेव्हां कांहींच वार्ता कळली नाहीं, तेव्हां एखाद्याला आपला अधिकार नसतां एखादी गोष्ट केल्याचा पस्तावा व्हावा, तसा पस्तावा त्यांस होऊं लागला. ज्या स्नेह्यांनीं तो पाठविण्याबद्दल आपल्याला प्रवृत्त केलें, त्यांचा उद्देश आपणाला बनविण्याचा तर नाहीं ना, अशीहि शंका त्यांच्या मनांत डोकावून गेली. पण ही शंका एक दिवस खोटी ठरली. संपादकाकडून गारवपूर्वक होकारार्थी पत्र आलें. पण या पत्रांत, " टीकाविषयक पुस्तक भिकार असूनहि आम्ही आपला लेख स्वीकारीत आहों. आपली भाषाशैली व विचार आम्हांस अतिशय आवडलीं," अशा अर्थाचीं वाक्यें लिहिण्यास मात्र संपादक विसरले नाहींत. या पत्रानें श्रीपाद कृष्णांस जो आनंद झाला त्याची कल्पना त्यांच्या स्थितींत असलेल्या लेखकांसच फक्त होईल. गगनांत न मावणारा असा तो आनंद होता. तो बोलून दाखवितां येत नाहीं किंवा हावभावांनीं व्यक्त करतां येत नाहीं. विस्तारकर्त्यांनीं दिलेल्या प्रसिद्धीमुळें श्रीपाद कृष्णांना नवा हुरुप आला. दुसऱ्याच वर्षी, नाटककारांच्या व नाटकवाल्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा व त्यांचें हास्यास्पद स्वरूप प्रगट करणारा देवलांच्या 'सं. शापसंभ्रम'वरील टीकात्मक लेख लिहिला जाऊन, विस्तारांत प्रसिद्ध केला गेला. या लेखानें विलक्षण खळबळ उडाली. देवल संतापले. त्यांच्या अंगाची लाही लाही झाली. या दिवसांत ते नाट्याचार्य म्हणून गणले गेले होते. मराठी नाटकांचा अंतिम आदर्श म्हणजे देवलांचीं नाटकें, अशी रंगभूमीवरील स्थिति होती. अशा

स्थितींत " शापसंभ्रमास आश्रय देणें हें धट्टयाकट्टया पायांच्या मनुष्यास कुबडी बक्षीस देण्यासारखें आहे," असा बेदरकार वृत्तीनें दिलेला अभिप्राय नाटककर्त्यांस सहन व्हावा कसा ! श्रीपाद कृष्णांनीं केलेली ही टीका देवलांना अखेरपर्यंत शल्याप्रमाणें बोंचत होती. या लेखाच्या स्वरूपाची अल्पशी कल्पना पुढील उताऱ्यावरून वाचकांस येऊं शकेल.

" शापसंभ्रम हें नाटक पद्यात्मक आहे हें नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. व हल्लींच्या संगीत नाटकांतील प्रधान रस ( शृंगार ) तर यांत ओतप्रोत भरला आहे. म्हणून अशा पुस्तकास आश्रय देणें हें धट्टयाकट्टया पायांच्या मनुष्यास कुबडी बक्षीस देण्यासारखेंच आहे."

" नाटकांचा मुख्य उद्देश ज्ञान देणें हा नाहीं खरा; तरी पण कांहीं नाटकांतून उपदेश घेण्यासारखा असतो; किंवा एखादें सामाजिक, राजकीय, धर्मविषयक तत्व काढण्यासारखें असतें; किंवा एखाद्या ऐतिहासिक पुरुषाचें अनुकरणीय चरित्र आढळतें. परंतु प्रस्तुत नाटकांत तसा कांहीं प्रकार नाहीं. संविधानक कांहीं ऐतिहासिक नाहीं, किंवा त्याचें मंथन करून कांहीं उपदेश निघण्यासारखा आहे असेंहि नाहीं. तेव्हां या दृष्टीनें या नाटकाचा विशेष उपयोग नाहीं. आतां हें नाटक रंगभूमीवर केलें असतां त्यास विशेष रंग येईल असेंहि आम्हांस वाटत नाहीं. जर रंगभूमीवर आणण्यास अपात्र असें एखादें नाटक जगांत असेल तर तें ' **शापसंभ्रम** ' यांत संशय नाहीं. ग्रीक लोकांमध्यें पूर्वीं नाटकास अवश्य मानिलेलीं अशीं तीन ऐक्यें असत. स्थलाचें, कालाचें व संविधानकाचें. या ऐक्यांची जरी मेकॉलेप्रभृति ग्रंथकारांनीं बरीच थट्टा केली आहे, तरी प्रत्येकास हें कबूल करावें लागेल, कीं यांकडे अगदींच दुर्लक्ष करून उपयोग नाहीं. प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीस बराच ताण पडेल असें नाटक तरी रंगभूमीवर आणण्याच्या भरीस सुज्ञ ग्रंथकारानें पडूं नये. आपणासमोर चाललें आहे तें सर्व खरें आहे असें प्रेक्षकांस भासविणें हें जर नाटकाचें मुख्य कर्तव्य असेल, तर ज्या गोष्टींनीं प्रेक्षकांच्या तल्लीनतेचा भंग होण्याचा संभव असेल अशा गोष्टी नाटकांत अजीबात न आणणें हें चांगल्या नाटककारांचें काम आहे. आम्हीं एकदां ' कुशलवाख्यान ' नाटकास गेलों असतां त्यांत आम्हांस एक चमत्कार दृष्टीस पडला. एक पात्र रंगभूमीवर बसलें असतां विदूषकानें त्यास जानकीस प्रसववेदना होत असल्याची बातमी कळविली. नंतर पुन्हां पडद्यांतून जाऊन येऊन मुलें झाल्याची बातमी कळविली. नंतर तिसऱ्यांदा विदूषक पडद्यांतून बाहेर येऊन कुश व लव ८।१०.

वर्षांचे झाले आहेत.व त्यांचे सर्व संस्कार झाले असून ते युद्धकर्मांत फार पटाईत झाले आहेत अशी बातमी घेऊन आला. आम्हीं आपल्या मिशांवरून हात फिरविला पण त्यांची लांबी जानकीच्या प्रसववेदनांच्या वेळीं जितकी होती तितकीच कुशलवांच्या आठव्या वर्षीं कायमच होती. हें पाहून आम्हांस मोठा चमत्कार वाटला. आंब्याची कोय जमिनींत पुरून तीपासून १५ मिनिटांच्या आंत मोठें झाड उद्भवलेलें आम्ही गारोड्याच्या खेळांत पाहिलें होतें, परंतु मनुष्यांची वाढहि तितक्याच झपाट्यानें झालेली पाहून मात्र आम्हीं अचंब्यांत बुडून गेलों."

"असो. पण या गोष्टीवरून इतकेंच घ्यावयाचें कीं, नाटकांतील प्रवेशांमधील स्थळ, काळ वगैरेसंबंधानें ग्रंथकर्त्यानें अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, त्यामुळें रसाचा वींमोड होऊं नये. पण कादंबरीचें नाटक करणारास यासंबंधानें किती अडचणी येतात हें एक त्या ग्रंथकर्त्यास ठाऊक. कादंबरीचें संविधानक अशा तऱ्हेचें आहे कीं तें कथेच्या रूपानें आणलें असतां मात्र सरस वाटावें. पण नाटकरूपानें आलें कीं झालेंच नीरस. तीन जन्मांतल्या उलाढाली तीन तासांच्या अवधींत आटपून टाकावयाच्या हें लहानसहान कर्म नव्हे. धन्य त्या देवलांची, कीं त्यांनीं या नाटकाला इतपत तरी रूप आणिलें आहे. तरी पण ज्यास कादंबरीचें कथानक अवगत नसेल त्यानें हा खेळ प्रथमच रंगभूमीवर पाहिला असतां त्याचा बराच घोंटाळा होईल हें आम्हीं पैजेनें सांगतों. रा. देवलांना आणखी दुसरे सुरस प्रवेश आणतां आले असते ते त्यांना या लगीनघाईमुळें आणतां आले नाहींत. उदाहरणार्थ, तारापीडाचें विलासवतीशीं भाषण, कादंबरीचें पत्रलेखेशीं मदनबाधाविषयक संभाषण, चंद्रापीड व द्रविड ब्राह्मण यांचा हास्यरसप्रचुर प्रवेश; इ० इ०, कादंबरींतील मूळांत कांहीं कांहीं उत्तम भाग तर असे आहेत कीं ते कथेच्या रूपानेंच शोभतात; उदाहरणार्थ अच्छोद सरोवराचें वर्णन, शुकनासानें चंद्रापीडास केलेला उपदेश, इ० इ०. त्या जगविख्यात बाणकवीच्या रसपरिप्लुत कादंबरीचें सेवन करून नंतर जो मनुष्य '**शापसंभ्रम**' नाटक हातीं घेईल त्यास प्रथम पाहिलेल्या एका प्रबल मल्लाचा अस्थिपंजर कांहीं दिवसांनीं पाहिल्याइतकें सखेद आश्चर्य वाटेल. आमचा आजचा शिरोलेख * उत्तररामचरित्रांतील आहे. श्रीरामचंद्र सीतेचा त्याग केल्यावर जेव्हां पुनः पंचवटीस

* 'निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिर्द्रढयति।'

आले, तेव्हां कालमहात्म्यानें त्या स्थलीं झालेला फेरफार पाहून त्यांच्या तोंडांतून हे खालील उद्गार निघाले. ‘ जेथें पूर्वी प्रवाह होता तेथें आतां नदीचें वाळुकामय तीर झालें आहे. जेथें पूर्वी दाट झाडी होती तेथें आतां झाडें तुरळक दृष्टीस पडतात. व जेथें झाडें कमी होतीं, तेथें त्यांची गर्दी झाली आहे. पुष्कळ वेळानंतर पाहिल्यामुळें हें अरण्य मला परकेंच वाटूं लागलें आहे व हेंच तें अरण्य असें भोंवतालच्या डोंगरावरून मात्र ओळखतां येतें.’ पुष्कळ काळ लोटल्यामुळें रामास जशी पंचवटी ओळखतां येईना, तशीच कादंबरीहि नाटकरूपानें अवतीर्ण झाल्यामुळें आम्हांस परकीशी वाटूं लागली आहे. व आमचेहि उद्गार हें नाटक वाचल्यानंतर असे निघाले कीं जर कादंबरी, महाश्वेता, चंद्रापीड इत्यादि ढळढळीत नांवें आमच्या दृष्टीस न पडतीं तर आम्हांस या नाटकाचें मूळ ओळखणें जड गेलें असतें. हा दोष रा. देवल यांचा नव्हे. त्यांनीं होईल तितकी खटपट करून यांत स्वारस्य आणण्याचा प्रयत्न केला आहे. पण ज्या नाटकांत संविधानकाकडे लक्ष दिलें कीं रसभंग होतो, व रसाकडे लक्ष दिलें कीं संविधानक बिघडतें, अशा नाटकांत देवलांसारख्यांची अनुभविक लेखणी तरी काय करणार ? फार कशाला ? ज्युलियस सीझरनें इंग्लंडदेश काबीज केल्यापासून तों तहत महाराणी व्हिक्टोरियाच्या कारकीर्दीपर्यंत जो काळ गेला त्याचें एक ऐतिहासिक नाटक बनविण्यास जर कविश्रेष्ठ शेक्सपिअर यास सांगितलें तर तो तरी बिचारा काय करील ? ”

या टीकात्मक लेखांत ‘सौभद्र,’ ‘रागिणी आणि तिचीं भावंडें,’ ‘तोतयाचें बंड,’ ‘प्रेमाभास,’ या टीकालेखांतील भाषेची प्रसन्नता, मनाचा समतोलपणा, गंभीर विचार, हृदयाला भुलविणाऱ्या काव्यमय उपमा हीं फारशीं आढळत नाहींत हें खरें, पण यांतील तडफ कांहीं विलक्षण आहे. हल्लीं कांहीं माला कादंबऱ्यांतून वहात असलेल्या घाणीप्रमाणें त्या वेळीं नाटकांतून शृंगाररसाचे पूर वहात होते व त्यांत, अशिक्षितांची गोष्ट सोडून द्या पण स्वतःला सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणविणारीं माणसेंसुद्धां यथेच्छ निमज्जन करीत होतीं. नाटक आणि नीति हे परस्परविरोधी शब्द बनले होते. शृंगाररसाचे पूर ज्यांतून वहात नाहींत तें नाटकच नव्हे, अशी लोकांची ठाम कल्पना झाली होती. याचा परिणाम सामाजिक जीवनावर झालेला स्पष्टपणें दिसत होता. अशा स्थितींत श्रीपाद कृष्णांसारख्या ध्येयवादी माणसाला स्वस्थ राहतां येणेंच शक्य नव्हतें. मराठी नाटकांतील या अनिष्ट प्रवृत्ति समाजाला आमूलाग्र पोखरून टाकल्याशिवाय राहणार नाहींत, अशी त्यांची पक्की खात्री झाली आणि यामुळेंच त्यांचें वेळींच उन्मू-

होतकरू माणसाला सरस्वतीमंदिरांत प्रवेश करतांना कोणकोणत्या आपत्तींना कसें-कसें तोंड द्यावें लागतें, याची त्यांना पूर्ण कल्पना आली. आयुष्यांत कधींहि न विसरला जाणारा हा प्रसंग होता. होतकरू तरुणांना सहानुभूतिपूर्वक मदत करण्याची, त्यांच्यांतील गुण वाढीला लावण्याची, त्यांच्यामध्यें जी एक प्रवृत्ति दिसून येते ती अशा तऱ्हेचे कटु अनुभव त्यांनीं अनुभविल्यामुळेंच होय. देवल एवढें बोलूनच स्वस्थ राहिले नाहींत, तर जो भेटेल त्याच्यासमोर 'वीरतनयाची' व त्यांतील पदांच्या चालींची निंदा करण्याचें सत्र त्यांनीं आरंभिलें. इतकेंच नव्हे तर कांहीं मित्रमंडळींसमोर—त्या ठिकाणीं कोल्हटकर वसलेले असतां—तुच्छतादर्शक उद्गार काढण्यासहि त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. श्रीपाद कृष्ण स्वस्थ बसणारे गृहस्थ नव्हते. त्यांनीं "देवल! बाण, शूद्रकासारखे दोस्त माझ्या पाठीशीं नाहींत. माझी उडी स्वतंत्र आहे. वीरतनय यशस्वी करून दाखविलें नाहीं, तर कोल्हटकरांच्या कुळांत व्यर्थ जन्मलों असें मी समजेन" असा रोख ठोक जबाब त्यांना दिला. या तेजस्वी उत्तरानें देवल नरमले, पण त्यांनीं आपली विरोधी चळवळ बंद ठेविली नाहीं.

देवलांचें त्या वेळीं किर्लोस्कर मंडळीवर विलक्षण वजन होतें. एखाद्या बड्या संस्थानिकाप्रमाणें मंडळीकडून त्यांचा इतमाम ठेविला जाई. त्यांच्यासमोर त्यांच्याविरुद्ध 'ब्र' काढण्याची कोणाचीहि छाती नव्हती. अशा स्थितींत वीरतनय व त्याचा कर्ता यासंबंधीं मालकांचीं मनें उदासीन बनविण्याचें कार्य यशस्वी व्हावें, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण अशा माणसाचे आंतून द्वेष करणारे लोकहि त्या ठिकाणीं असतातच. त्यांचा वरचष्मा सहन न होणारीं कपनींतहि कांहीं माणसें होतीं. त्यांनीं देवलांचे डाव हाणून पाडावयाचे ठरविलें. * भाऊराव कोल्हटकरांचा पसंतीचा शिक्का नाटकावर आधींच बसला असल्याकारणानें, नाटक परत करतां येणें शक्यच नव्हतें. त्यामुळें त्यांची इभ्रत कमी झाली असती, लोकांत हंशा झाला असता. नाटक रंगभूमीवर आणणें त्यांना भागच होतें. त्यामुळें उशिरां का होईना, नाटक एकदांचें रंगभूमीवर आलें. नाटकाचा पहिला प्रयोग नगरला झाला. मंडळीचा मुक्काम हालण्याच्या बेतांत असतां याचा

---

* ही हकिकत देण्याचा हेतू देवलांची निंदा करण्याचा नसून, त्यांच्यासारखीं थोर माणसेंसुद्धां कित्येकदां क्षुद्र विकारांना बळी पडून, होतकरू माणसांचा बळी घ्यावयास कशीं कारण होतात, हें दाखविण्याचा आहे.

' शेवटचा खेळ ' म्हणून प्रयोग करण्यांत आला होता. प्रयोग यशस्वी झाला तर ठीक, नाहींतर तो पहिला आणि शेवटचाच खेळ असें ठरवून पुढील मुक्कामीं निघून जावयाचें, असें मंडळीनें ठरविलें होतें. नाटककाराचें सारें भवितव्य या प्रयोगावर अवलंबून होतें.

## आणीबाणीची वेळ.

श्रीपाद कृष्णांच्या आयुष्यांतील ती आणीबाणीची वेळ होती. नाटकाच्या यशस्वितेवर त्यांच्या पुढील वाङ्मयिक जीवनांतील यशस्विता अवलंबून होती. त्यांचा तो दिवस अत्यंत काळजींत गेला. त्यांचा आत्मविश्वास त्यांना आंतून धीर देत होता, तर भोंवतालची प्रतिकूल परिस्थिति बाहेरून भेवडावीत होती. अखेर प्रयोगाची रात्र आली. नाटकगृहांत हळुहळु लोक प्रवेश करूं लागले. पहिल्या अंकाच्या प्रारंभीं प्रेक्षक थोडे दिसत होते. पण दुसऱ्या अंकाच्या सुरवातीस नाटकगृह चिकार भरून गेलें. नाटकांतील विनोद व पदांच्या चाली त्यांना नव्या होत्या. प्रेक्षक अखेरपर्यंत उल्हासपूर्वक नाटक पहात होते. नगरांत नाटक अतिशय लोकप्रिय झालें, तें इतकें, कीं ' शेवटचा खेळ ' करून दुसऱ्या मुक्कामीं जाऊं इच्छिणाऱ्या मंडळीला आणखी कांहीं दिवस नगरांत राहून, वीरतनयाचे जादा प्रयोग करावे लागले. श्रीपाद कृष्णांना आपण देवलांना बोललों तसें करून दाखविलें हें पाहून हायसें वाटलें. पण एवढयानें भोंवतालची परिस्थिती बदलणारी नव्हती. वीरतनयाचा जेवढा जेवढा अधिकाधिक बोलबाला होऊं लागला तेवढे तेवढे अधिकाधिक शत्रू श्रीपाद कृष्णांसमोर कलमयुद्धें लढण्याकरितां ठाकूं लागले. बक्षिसाकरितां पाठविलेलें नाटक किर्लोस्कर मंडळीनें नापसंत केल्यामुळें,चिडून गेलेल्या एका गृहस्थानें तर वेगवेगळ्या वृत्तपत्रांत वेगवेगळ्या टोपण नांवांनीं लेख लिहून, नाटकाविरुद्ध एकच वावटळ उडवून दिली. पण यावरहि ताण, किर्लोस्कर मंडळी मुंबईंत आली असतां एका प्रतिस्पर्धी नाटक कंपनीनें केली. मुंबईंत पहिला खेळ व्हावयाच्या दिवशीं **' वीरतनयाची ' जाहिरात गाढवांच्या पाठीवर चिकटवून** त्याची सबंध शहरांतून मिरवणूक या कंपनीच्या लोकांकडून काढण्यांत आली. मनाच्या क्षुद्रतेची याहून ती आणखी कोणती परिसीमा असणार ?

वीरतनयावर झालेल्या बहुतेक टीका विकारवश लेखकांच्या लेखण्यांतून बाहेर पडलेल्या होत्या. त्यांतल्यात्यांत विनायक शिवराम खरे यांची विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेली टीका, बरीच निःपक्षपाती व विचारणीय अशी होती. पदांच्या क्लिष्टतेचे त्यांनीं दाखविलेले दोष बऱ्हशीं खरे होते. श्रीपाद कृष्णांच्या

पदात उच्च प्रकारचें काव्य व नादमाधुर्य हीं असतात खरीं, परंतु त्यांचा आस्वाद संस्कृतप्रचुर भाषेमुळें साधारण वाचकास किंवा श्रोत्यास घेणें कित्येकदां अशक्य होतें. मूकनायकांतील 'हे प्रभो विभो,' 'कपोला कपोलाची ईच्या सरी,' 'तुजविण गमे वृथा संसार,' 'सहज कशि खेळविते ललना' किंवा जन्मरहस्यांतील 'मी आहें नवरी तुला शोभणारी' हीं व प्रेमशोधनमधील कांहीं पदें वगळल्यास श्रीपाद कृष्णांना देवलांप्रमाणें साधीं, सरळ, अर्थपूर्ण पण नादमधुर अशीं पदें रचणें केव्हांहि साधलें नाहीं असें म्हणावें लागेल. १८९८ च्या ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यांत श्रीपाद कृष्णांनीं विविधज्ञानविस्तारांतून '**वीरतनयाची ढाल**' या मथळ्याखालीं आपल्या टीकाकारांना विस्तृत उत्तर दिलें.

नाटकाच्या भानगडींत चित्त गुंतल्यामुळें एलएल. बी. ची परीक्षा पास होण्यास श्रीपाद कृष्णांस विलंब लागला. १८९४ सालीं जी परीक्षा ते वास्तविक पास व्हावयाला पाहिजे होते, ती पास होण्यास त्यांना १८९७ साल पहावें लागलें. त्यांची लौकिक विद्यार्थीदशा आतां संपली होती. नवा व्यवसाय, नव्या जबाबदाऱ्या त्यांना आतां स्वीकारावयाच्या होत्या.

अकोल्याला त्यांनीं ४–५ महिने वकिली केली. परंतु इसबाच्या विकारामुळें त्यांना एका कोर्टांतून दुसऱ्या कोर्टांत—मैलाचें अंतर असल्यामुळें—जाणें त्रासदायक होऊं लागलें. त्यामुळें जेथें एकच कोर्ट असेल अशा शहरीं जाण्याचा त्यांचा विचार ठरला. या विचाराप्रमाणें ते १८९८ च्या अखेरीस तेल्हाऱ्याला (वऱ्हाड) गेले. या ठिकाणीं ते सहा वर्षें होते. पुढें येथील कोर्ट १९०५ सालीं खामगांवास आल्यामुळें त्यांना तेथें यावें लागलें. १९१८ सालीं जळगांव (जामोद) येथें स्वतंत्र कोर्ट उघडण्यांत आलें. श्रीपाद कृष्णांचीं बहुतेक कुळें याच तालुक्यांतील असल्यामुळें ते जळगांवास गेले. चालू महिन्यापर्यंत ते तेथेंच होते. यापुढें आपलें शेष आयुष्य खामगांवासच घालविण्याचा त्यांचा विचार आहे. या ठिकाणीं त्यांनीं शेतवाडी विकत घेतली असून, एक मोठें घरहि बांधलें आहे.

१८९८ पासून १९२७ पर्यंतच्या २९ वर्षांचा काल हा श्रीपाद कृष्णांचा ऐन कर्तबगारीचा काल असें म्हटलें पाहिजे. या कालांत त्यांच्या लेखणींतून चिरंजीव असें बहुविध वाङ्मय बाहेर पडलें. या महत्वाच्या कालाचा इतिहास 'वाङ्मयपरिचय' या स्वतंत्र विभागांत येईलच.

आज श्रीपादकृष्णांचें वय ५६ वर्षांचें आहे. त्यांचें शरीर दिवसेंदिवस थकूं लागलें आहे. एका डोळ्यांत मोतीबिंदु पडला असून दुसरा डोळाहि कांहीं महिन्यांपूर्वीं

'ग्लॉकोमाच्या ' रोगानें निकामी होऊं लागला होता. नुकतीच त्यावर मुंबईचे कुशल व प्रख्यात नेत्रवैद्य डॉ. सरदेसाई यांजकडून शस्त्रक्रिया करण्यांत आली.

## कुटुंबांतील मंडळी.

यांच्या कुटुंबांतील मंडळी म्हणजे हे, यांची पत्नी, चार मुलगे व एक मुलगी ही होय. मुलीचें लग्न नाशिक कॉलेजांतील प्रोफेसर रा. पाटणकर यांच्याशीं झालें असून, बाकीचे मुलगे आपआपले व्यवसाय सांभाळून आहेत. या मुलांपैकीं रा. प्रभाकरपंत यांस लेखनाची हौस असून, ते मराठी नियतकालिकांत मधून मधून आपल्या लघुकथा, विनोदी लेख प्रसिद्ध करीत असतात.

## स्वभावविशेष.

श्रीपाद कृष्णांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ, विनोदी, मिंडस्त, निगर्वी पण करारी असा आहे. त्यांना सहसा राग येत नाहीं. निरपेक्षपणें काम करावयाचें हा बाणा असल्यामुळें, निराश होण्याचे प्रसंग त्यांजवर क्वचितच येतात. आहे ती परिस्थिती चांगली असें मानून नेहमीं आनंदांत रहाण्याची संवय जडल्यामुळें, संकटें किंवा प्रतिकूल परिस्थिती त्यांना उदासीन बनवूं शकत नाहीं. आपल्या भोंवतीं नेहमीं तरुण माणसें असावीं, असें त्यांना नेहमीं वाटत असतें. वृद्धांचा सहवास ते शक्य तेवढा टाळीत असतात. त्यांच्या सहवासांत आपल्याला उत्साह न वाटतां उदासवाणें वाटूं लागतें; या लोकांच्या तोंडून रोग, औषध आणि मृत्यु या विषयांखेरीज अन्य विषयच निघत नाहींत, त्यामुळें आपण एखाद्या रुग्णालयांत आहों असें वाटूं लागतें, असें ते कित्येकदां विनोदानें म्हणतात. ते शरीरानें जरी वृद्ध झाले असले, तरी मनानें तरुणाहूनहि तरुण आहेत. बुद्धिपुरस्सर कोणाला कधीं त्रास द्यावयाचा नाहीं, कोणाचें कधीं अनहित चिंतावयाचें नाहीं, उलट कोणाला आपल्या हातून मदत करतां येणें शक्य असेल तर ती करावयाची, अशी मूळपासून वृत्ति असल्यामुळें त्यांना शत्रू असे कोणी नाहींत. स्नेह्यांचा परिवार मात्र अतिशय विस्तृत आहे. यांतील सर्वांशीं त्यांचा पत्रव्यवहार नियमितपणें चालत असतो. कोणतेंहि काम—मग तें आपल्या अशिलाचें कागद तपासणीचें असो किंवा छापखान्यांतील स्थूल मुद्रितें दुरुस्त करण्याचें असो—ते अत्यंत दक्षतेनें करीत असतात. कामांत एवढीशी जरी चूक राहिली, तरी त्यांचें मन अस्वस्थ होतें. श्रीपाद कृष्णांमधील दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सौंदर्याकुलता होय. सौंदर्याच्या दर्शनानें ते विलक्षण मुग्ध होऊन जातात. सुंदर वस्तु, सुंदर माणूस, सुंदर आवाज, सुंदर बोलणें, सुंदर चालणें, सुंदर लिहिणें, सुंदर विचार, सुंदर भाषा हीं त्यांना फार लवकर

आकर्षूं शकतात. त्यांच्या स्मरणांत त्यांची कायमची नोंद केली जाते. लोकांच्या दोषांपेक्षां गुणांकडेच त्यांचें लक्ष अधिक असतें. यामुळेंच ते–लहानांपासून थोरांपर्यंत–सर्वांनाच प्रिय असतात. त्यांच्या प्रेमळ सहवासांत कांहीं क्षण तरी राहावयाला मिळावें अशी प्रत्येकाची इच्छा असते.

श्रीपाद कृष्णांच्या आवाजांत अजूनहि गोडी राहिलेली आहे. आपल्या नाटकांतील पदें भेटीला आलेल्या मित्र मंडळीला म्हणून दाखविण्यांत त्यांना अतिशय आनंद वाटत असतो. त्यांचें बोलणें नेहमीं गोड, आकर्षक व विनोदपूर्ण असें असतें. बोलतांना ओंठावर नेहमीं स्मित झळकत असतें. जाहीर सभांत ते क्वचितच बोलतात. पूर्वीं पूर्वीं तर ते कोणत्याहि सभेंत भाग घेत नसत. गेल्या दहाबारा वर्षांपासून ते जाहीरपणें बोलूं लागले आहेत. पहिल्या पहिल्यानें बोलतांना त्यांची फार धांदल उडे. 'मी या ठरावाला पुष्टि देतों' एवढें वाक्यसुद्धां उच्चारणें त्यांना कठीण जाई. हल्लीं ते अस्खलितपणें तास-पाऊणतासपर्यंत बोलूं शकतात. त्यांच्या लेखांप्रमाणेंच त्यांच्या भाषणांतहि उपमा, अलंकार, कोट्या इतस्ततः विखुरलेल्या असतात. भाषणाच्या प्रारंभींच श्रोत्यांना आपल्याकडे औत्सुक्यपूर्वक आकर्षून घेण्याची कला त्यांना उत्तम साधली आहे. भाषणांतील पहिल्या वाक्याचीच अशी कांहीं योजना केलेली असते, कीं तें उच्चारिल्यावरोबर श्रोतृगण चटकन् आकर्षिला जावा. विलिंग्डन कॉलेजांत त्यांचें एकदां विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान व्हावयाचें होतें. कॉलेजचें सभागृह तरुण विद्यार्थ्यांनीं चिकार भरून गेलें होतें. अध्यक्ष व प्रसिद्ध ज्योतिषी केतकर या दोन गृहस्थांखेरीज तेथें कोणी वृद्ध माणूस नव्हतें. त्यांना विद्यार्थ्यांना सांगावयाचें होतें, कीं, आपल्याला वृद्ध माणसें आवडत नाहींत, तरुण माणसें आवडतात आणि यामुळें तुमच्या समोर बोलायला मला अतिशय उत्साह वाटत आहे. पण ते शेजारीं दोघे वृद्ध गृहस्थ बसले असतां असें वाक्य कसें उच्चारावें, ही त्यांना पंचाईत पडली. कांहीं क्षण थांबून, ओंठावर स्मित आणून त्या दोघांकडे पहात ते उद्गारले, "मला वृद्धांचा सहवास फारसा आवडत नाहीं. अर्थात्, माझ्या शेजारीं बसलेले हे दोघे याला अपवाद आहेत. मला तुमच्या सारख्या तरुणांचाच सहवास अधिक आवडतो." या वाक्यांनीं कांहीं मिनिटें हंशाच हंशा पिकला हें निराळें सांगावयाला नकोच.

## तीव्र जिज्ञासा व दीर्घोद्योग.

आपल्यामध्यें आज आढळून येणारी तीव्र जिज्ञासु वृत्ति जर नसती, तर आपल्या हातून विशेष कांहीं घडलें असतें असें वाटत नाहीं, असें ते वारंवार म्हणत असतात

आणि तें बऱ्हंशीं खरेंहि आहे असं त्यांच्या '**भारतीय ज्योतिर्गणित**' या निबंधावरून वाटूं लागतें. गणित विषय मुळचा नावडता व कच्चा असतांहि केवळ जिज्ञासेखातर 'शून्यलब्धी'चा व ज्योतिःशास्त्राचा त्यांनीं अभ्यास केला. जवळ जवळ पांच सहा वर्षे ते या निबंधाकरितां खपत होते. १९२० सालीं सांगलीला भरलेल्या ज्योतिषसंमेलनाचें अध्यक्षस्थान या महत्वाच्या निबंधामुळेंच त्यांना मिळालें. आपल्यामध्यें अशा तऱ्हेची जिज्ञासुवृत्ती व ज्ञानाबद्दलची भूक उत्पन्न व्हावयाला "Conflict between Science and Religion" या नांवाचें पुस्तक बरेंचसें कारणीभूत झालें, असें ते म्हणतात.

## पत्रव्यवहार.

महाराष्ट्रांतील होऊं घातलेल्या बाललेखकांपासून तों प्रसिद्धी पावलेल्या थोर लेखकांपर्यंत सर्वांचा त्यांच्याशीं पत्रव्यवहार असतो. प्रत्येक पत्राचें वेळेवर उत्तर लिहिण्यास ते कधींहि आळस करीत नाहींत. एखाद्यानें पत्र पाठविलें आणि त्याचें त्याला उत्तर आलें नाहीं, असं कधीं होत नाहीं. चालढकल हा शब्दच त्यांच्या कोशांत कधीं आढळावयाचा नाहीं. 'आपण पत्रव्यवहाराचीं कामें आजचीं उद्यां-वर टाकीत नाहीं. याचें कारण सुट्टीचा दिवस आपल्याला निर्वेधपणें स्वतःसाठींच खर्च करावयास मिळावा हें आहे,' असें ते म्हणतात.

## ग्रंथांवरील अभिप्राय.

श्रीपाद कृष्णांकडे प्रत्येक नवें नियतकालिक किंवा पुस्तक अभिप्रायाकरितां नेहमीं येत असतें. त्यावर काळजीपूर्वक अभिप्राय देण्याची खबरदारी ते नेहमीं बाळगीत असतात. लेखकांच्या लेखनांतील ऱ्हस्वदीर्घादि चुकांचा उल्लेख करण्या-सहि ते चुकत नाहींत. असें असतां 'कोल्हटकरांचा अभिप्राय हा नेहमीं चांग-लाच असावयाचा, त्यांत दोषदर्शन हें कधीं दिसावयाचेंच नाहीं,' अशी लोकांची गैरसमजूत झालेली आहे. याचा दोष, दोषांचें केलेलें विवेचन वगळून प्रोत्साहन-पर लिहिलेले शब्द तेवढे प्रसिद्ध करणाऱ्या लेखकांकडे व प्रकाशकांकडे आहे. या लोकांची धंदेवाईक दृष्टि असल्यामुळें, अभिप्रायांचा उपयोग स्वतःचें लेखन किंवा प्रकाशन हीं सुधारण्याकडे न करतां पुस्तकाची जाहिरात आकर्षण करण्याकडे बेदरकारपणें केला जातो. आपल्या या वर्तनानें अभिप्राय देणाऱ्या व्यक्तीला कोणत्या चमत्कारिक परिस्थितींत आपण ढकलीत असतों, याची त्यांना कल्पना नसते आणि ती असली तरी त्याची त्यांना पर्वा नसते. यामुळें श्रीपाद कृष्ण

हल्लीं प्रकाशकाकडून किंवा लेखकाकडून ‘आपण अभिप्राय कोठेंही प्रसिद्ध करणार नाहीं’ असें वचन घेतल्याखेरीज त्याच्या ग्रंथावर अभिप्राय देईनासे झाले आहेत.

### आवडते ग्रंथकार.

स्कॉट, मेकॉले, गोल्डस्मिथ, ॲडिसन, थॅकरे, मार्कट्वेन, जेरोम के. जेरोम हे यांचे आवडते ग्रंथकार आहेत.

### वाचन.

श्रीपाद कृष्णांचें वाचन दांडगें आहे. मराठींतील प्रत्येक नवें पुस्तक, मासिकांतील प्रत्येक लेख ते काळजीपूर्वक वाचीत असतात. त्यामुळें वाङ्मयांतील नव्या नव्या प्रवृत्तीशीं ते फार लवकर समरस होऊं शकतात.

### त्यांचा धर्म.

चराचराला व्यापून असलेली अदृश्य अशी एक शक्ति आहे आणि त्या शक्तीच्या इच्छेनेंच जग चाललें आहे असा त्यांचा विश्वास आहे.

### पापपुण्याची कल्पना.

आपल्यामध्यें ज्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांचा त्यांचा योग्य ठिकाणीं व्यय करणें हेंच पुण्य व अयोग्य ठिकाणीं व्यय करणें हेंच पाप, अशी त्यांची दृढ समजूत आहे.

### पुरुषोत्तम.

प्रत्येक मनुष्यानें उद्योग करीत राहिलें पाहिजे, मन रिकामें राहूं देतां कामा नये, त्याला कांहीं ना कांहीं तरी सद्व्यवसायांत गुंतविलेंच पाहिजे; तसें तें न गुंतविल्यास तें एक सैतानाचें दुकान होईल अशी त्यांची प्रत्येक तरुण माणसाला शिकवणूक असते. माणसानें मनांत आणलें तर उद्योगाच्या जोरावर तो पुरुषोत्तम ( Superman ) या पदवीला पोंचूं शकेल व तसें पोंचणें प्रत्येकाच्या हातीं आहे यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे.

### महाराष्ट्राचा आवडता ग्रंथकार.

श्रीपाद कृष्ण हे महाराष्ट्राचे आवडते ग्रंथकार आहेत. त्यांच्या अष्टपैलु बुद्धिमत्तेबद्दल त्याला अभिमान वाटतो. त्यांनीं महाराष्ट्र साहित्यांत घडवून आणलेल्या क्रांतीची जाणीव त्याला आहे. आणि म्हणूनच साहित्य परिषदेच्या अध्यक्षस्थानासारख्या महत्वाच्या जागीं त्यांची एकमतानें निवडणूक करून, त्यानें त्यांचा यंदां अपूर्व असा गौरव केला आहे.

---

# वाङ्मयपरिचय.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत रानडे आगरकरांनीं उभारलेला सामाजिक क्रांतीचा झेंडा तसाच अविरत फडकत रहावा म्हणून, ज्या व्यक्तींनीं रात्रंदिन खटाटोप चालविले, त्यांत श्रीपाद कृष्णांची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. महाराष्ट्राचा गेल्या एक शतकाचा सामाजिक इतिहास कोणा महाभागानें लिहावयास घेतल्यास, त्यास श्रीपाद कृष्णांनीं आपल्या लेखणीच्या द्वारा महाराष्ट्राच्या विचारांत व आचारांत घडवून आणलेली क्रांती विसरून चालणार नाहीं. त्यांनीं आपला प्रत्येक ग्रंथ व प्रत्येक लेख समाजाला कांहीं तरी सांगण्याकरितां, त्याच्या विचारांना चालना देण्याकरितां लिहिलेला आहे. आणि म्हणूनच श्रीपाद कृष्णांच्या वाङ्मयाचें वाङ्मय या दृष्टीनें जसें महत्व आहे, तसेंच किंवा त्याहूनहि अधिक सामाजिक क्रांतीच्या दृष्टीनें आहे. कविता, कादंबरी, कथा, नाटक, टीकालेख, विनोदी लेख या सर्वांमधून त्यांनीं महाराष्ट्राला नवा संदेश दिला आहे आणि तो क्रांतीचा होय. आजची पिढी त्यांच्या वाङ्मयाचें जर आस्थापूर्वक अध्ययन करील तर त्यांना आम्ही म्हणतों त्याची खात्री पटेल. श्रीपाद कृष्णांची लेखणी थांबल्यानंतर '**मूकनायक**,' '**वधूपरीक्षा**,' '**जन्मरहस्य**,' '**मतिविकार**' यांच्या योग्यतेचें एक तरी नाटक रंगभूमीवर आलें काय? सध्यां जीं नाटकें रंगभूमीवर झळकत आहेत त्यांच्यापैकीं कितींत हा क्रांतीचा संदेश सांगितला आहे? कलेच्या किंवा वाङ्मयाच्या दृष्टीनें तरी यांत कांहीं नाविन्याची किंवा वैचित्र्याची भर पडली आहे काय? या प्रश्नांना 'नाहीं' हेंच उत्तर येईल. नाट्यवाङ्मयाची अशी स्थिती कां बरें असावी? याला एकच कारण आणि तें म्हणजे आमची स्वतंत्र विचार करण्याची शक्ति नष्ट झाली असून, वाङ्मयवृद्धि खुंटवून त्याला निस्तेज करणारी अमर्याद व्यक्तिपूजेची व अंधानुकरणाची खोड जडूं लागली आहे, हें होय. ती जोंवर दूर होणार नाहीं तोंवर वाङ्मयोत्कर्षाची आशाच करावयास नको.

श्रीपाद कृष्णांच्या वाङ्मयसंपत्तीचे स्थूलमानानें नाटक, कथा, विनोद, काव्य व टीका असे पांच विभाग पडतात. या सर्वांसंबंधीं लिहावयाचें म्हणजे तो एक भला मोठा स्वतंत्र असा ग्रंथच होईल. स्थलाच्या व कालाच्या अभावामुळें तूर्त केवळ परिचयावरच भागवून नेणें प्राप्त झालें आहे. त्यांच्या वाङ्मयाचें अंतरंग बारकाईनें जाणून घेण्याची ज्याला इच्छा असेल, त्यानें मूळ ग्रंथांचा अभ्यास करावा व स्वतंत्रपणें त्यांसंबंधींचें आपलें मत बनवावें.

पाहण्यांत नाहीं. ही टीका चित्रशाळेनें प्रसिद्ध केलेल्या ' **लेखनसंग्रहांत** ' पुनर्मुद्रित केली आहे. श्रीपाद कृष्णांच्या अभ्यासकांनीं ती जरूर वाचावी. यानंतरचीं त्यांचीं नाटकें ' **सं. प्रेमशोधन,** ' ' **वधूपरीक्षा,** ' ' **सहचारिणी,** ' ' **परिवर्तन,** ' ' **जन्मरहस्य** ' **व** ' **शिवपावित्र्य** ' हीं होत; ' **सं. प्रेमशोधन** ' हें प्रेमविषयक नाटक असून त्यांतील पदें गोड व अर्थपूर्ण अशीं आहेत. ' **मूकनायक,** ' ' **जन्मरहस्य** ' यांच्या खालोखाल याचा गुणाच्या बाबतींत नंबर लागेल. हें नाटक किर्लोस्कर नाटक मंडळीनें १९०८ सालीं रंगभूमीवर आणलें. ' **वधूपरीक्षा** ' व ' **सहचारिणी** ' हीं नर्मविनोदात्मक नाटकें असून त्यांतील पहिलें गद्यात्मक असून दुसरें पद्यात्मक आहे. महाराष्ट्र नाटक मंडळी व गंधर्व संगीत मंडळी ह्या यांचे अनुक्रमें प्रयोग करीत असत. बाकीच्या तीन नाटकांपैकीं ' **परिवर्तन** ' व ' **शिवपावित्र्य** ' हीं गद्यात्मक असून तीं रंगभूमीवर अद्याप आलेलीं नाहींत. पुस्तकरूपानें मात्र तीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. ' **परिवर्तनांतील** ' विषय स्त्रियांचे समान हक्क हा असून तो अत्यंत विनोदी स्वरूपांत मांडला गेला आहे. ' शिवपावित्र्यांतील ' कथानक शिवाजी महाराजांच्या चरित्रांतील ' आबाजी सोनदेवानें कल्याणच्या सुभेदाराची सुन नजराणा म्हणून महाराजांसमोर आणून उभी केली ' या प्रसंगावर उभारलेलें आहे. आतां एकाच नाटकाबद्दल लिहावयाचें राहिलें आणि तें म्हणजे नाट्यलेखन-कौशल्याचा उत्तम नमुना (Masterpiece) म्हणून मानलें गेलेलें '**जन्मरहस्य**' होय. हें कै. केशवराव भोसल्यांच्या ललितकलादर्श मंडळीकरितां म्हणून लिहिलें होतें, परंतु कै. गडकऱ्यांच्या अत्याग्रहामुळें त्यांस बलवंत संगीत मंडळीस द्यावें लागलें. याचे कांहीं दिवसपर्यंत रंगभूमीवर प्रयोगहि होत असत. पुढें तें कां बंद पडलें कळत नाहीं. वास्तविक रंगभूमीला ' **मूकनायकाच्या** ' बरोबरीनें उच्च दर्जा आणून देणारें जर कोणतें नाटक असेल तर तें ' **जन्मरहस्य** ' हेंच होय. याच्यासारखें प्रमाणबद्ध नाटक श्रीपाद कृष्णांच्या नाटकांत एकहि सांपडणार नाहीं.

## नाटकांतील विनोद

श्रीपाद कृष्णांच्या नाटकांतील विनोद सौंदर्यपूर्ण व काव्यमय असा असतो. त्यांच्या कोटयांत अश्लीलत्वाची झांक क्वचितच दिसून येते. त्या जशा बुद्धीला गुंगवितात तशा हृदयालाहि भुलवितात. विचारांच्या प्रवाहाबरोबर त्यांना आपोआप कोटया सुचूं लागतात, पण त्यांचा ते मर्यादेबाहेर कधीं उपयोग करीत नाहींत. प्रमाणबद्धता हा त्यांच्या विनोदांत सांपडणारा अप्रतिम गुण आहे.

## नाटकांची भाषा.

यांच्या नाटकांतील भाषा साधी पण सौंदर्यपूर्ण असते. पात्राच्या स्वभावाला पोषक अशीच भाषा त्यांच्याकडून उपयोगिली जाते. उपमा, अलंकार, श्लेष, कोट्या, वक्रोक्ति, व्यंगोक्ति यांनीं त्यांचें भाण्डार सदैव भरलेलें असतें; परंतु त्याची वाटेल तशी उधळपट्टी ते करीत नाहींत.

## विनोदी लेख.

श्रीपाद कृष्णांच्या विनोदी लेखनाला सुरुवात १९०२ पासून झाली. यांचा पहिला विनोदी लेख ' साक्षिदार ' हा होय. आत्तांपर्यंत त्यांचे बत्तीस लेख प्रसिद्ध झाले असून ते '**सुदाम्याचे पोहे** किंवा **साहित्यबत्तिशी**' या नांवानें पुस्तकरूपानें एकत्र प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

' सुदाम्याच्या पोह्यांनीं ' मराठी वाङ्मयांत एका महत्वाच्या नव्या लेखनपद्धतीचा पाया घातला. या पोह्यांचें महत्व पटवून देणारा एक चर्चात्मक निबंध श्रीपाद कृष्णांचे एक मार्मिक अभ्यासक रा. वि. स. खांडेकर यांनीं मुंबईच्या ' रणगर्जना ' पत्रांत नुकताच पांच लेखांकांत प्रसिद्ध केला आहे. यांतील एका लेखांकांत ' सुदाम्याच्या पोह्यांचें ' महत्व वर्णन करतांना ते म्हणतात, " सुदाम्याच्या पोह्यांचें महत्व विषयांपेक्षांहि प्रतिपादनाच्या पद्धतींत आहे. त्यांतील धार्मिक, सामाजिक व कलाविषयक विषयांची चर्चा पूर्वीं थोडीफार झाली असेल नाहीं असें नाहीं. पण ती चर्चा वर्तमानपत्री लेख अगर निबंध यांच्या द्वारानें होई. चटकदारपणा, मनोरंजकपणा अगर आकर्षकपणा या लेखांमध्यें अगर निबंधांत फारच थोडा असे, आणि असला तर तो भाषेचें ओज अगर उपमांचें प्राचुर्य यांच्यापासून उत्पन्न झालेला असे. लेखनाचा विचार हा आत्मा व भाषा हा देह मानण्याचा प्रघात आहे. पण आत्मा व देह यांच्यामध्यें ज्याप्रमाणें मन व बुद्धि असतात, त्याप्रमाणें विचार व भाषा यांच्यामध्येंहि लेखनपद्धति व विशिष्ट शैली हीं असतात. ज्ञानाच्या दृष्टीनें दोन वक्ते सारखेच असले तरी वक्तृत्व, विनोद वगैरे गुण ज्याला साध्य असतील त्यांचेंच व्याख्यान जसें परिणामकारक व लोकप्रिय होतें, त्याप्रमाणें ' सुदाम्याच्या पोह्यांनीं ' निर्माण केलेल्या लेखनपद्धतीनें मांडलेले विचारच नेहमींपेक्षां चटकदार व परिणामकारक झाल्यावांचून राहत नाहींत. मनोरंजनाच्या द्वारा बोध हेंच कोणत्याही ललितवाङ्मयाचें ध्येय असतें; व हें ध्येय निबंधांपेक्षां विनोदी लेखांनींच लोकांच्या गळीं उतरवितां येतें.

कोल्हटकरांनीं पोद्यांतील प्रत्येक लेखाची उभारणी असंबद्धतेच्या पायावर केली आहे. ही असंबद्धता सामाजिक, धार्मिक अगर विचारात्मक असल्यामुळें ती अमूर्त आहे. हरिभाऊंनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्यांत असंबद्ध व्यक्ति दाखविल्या; कोल्हटकरांनीं असंबद्ध समाज, विसंगत विचार व विसंवादी आयुष्यक्रम रेखाटला. समाजसुधारणेच्या दृष्टीनेंच कोल्हटकरांनीं अनेक लेख लिहिले असल्यामुळें त्यांच्या लेखांत बोध आहे हें सांगावयास नकोच. सहानुभूति व सभ्यता हे गुण कादंबरीच्या कुशल कलमाइतके क्रांतिकारक निबंधकाराच्या लेखणींत असणें फारसें शक्य नसतें. यामुळें कोल्हटकरांचा विनोद क्वचित् व किंचित् कठोर आहे. तथापि धार्मिक, सामाजिक, कलाविषयक इत्यादि विषयांवर ते विनोदी लेख लिहितात. एवढेंच नव्हे तर ज्या विषयांत सामान्य मनुष्याला विनोदाचा भास देखील होणार नाहीं असा विषयदेखील ते विनोदानें नटवून सजवून वाचकांपुढें मांडूं शकतात."

कोल्हटकरांनीं आपल्या विनोदाकरितां बहुजनसमाजाला ज्यांबद्दल आदर वाटतो, असे धार्मिक विषय घेण्यांत मोठी चूक केली आहे असा पुष्कळांचा त्यांजवर आक्षेप आहे. शिमगा, श्रावणी, गणेशचतुर्थी हे लेख ज्या वर्षीं प्रसिद्ध झाले त्या वर्षीं त्यांजवर टीकांचा जिकडून तिकडून भडिमार झाला. या टीकांना त्यांनीं '**माझे टीकाकार**' या लेखांत समर्पक उत्तर दिलें आहे. मूर्खपणा हा तर विनोदाचा आत्मा आहे. तो जेथें जेथें सांपडेल तेथें तेथें आपलें उपहासाचें शस्त्र चालवावयाचें हा तर विनोदी लेखकांचा धर्मच आहे. अशा स्थितींत त्याला अपवाद होऊन, श्रीपाद कृष्ण धर्मच्युत कसे होतील! हिंदु धर्मांतील कांहीं असंबद्ध गोष्टींवर त्यांनीं चढविलेला हल्ला, रा० वासुदेव गोविंद आपट्यांसारख्या कांहीं सोंवळ्या साहित्यभक्तांस जरी अयोग्य वाटला, तरी योग्यच होता असें आम्हांस वाटतें.

श्रीपाद कृष्णांचे विनोदी लेख त्यांच्या इतर कोणत्याहि लेखांपेक्षां किंवा नाटक कादंबऱ्यांपेक्षां अधिक लोकप्रिय झाले आहेत. केशव, गोविंद हीं संध्येंतील नांवें लोक एक वेळ विसरतील (चालू पिढी विसरत चाललीच आहे) पण सुदाम्याच्या पोह्यांतील पांडुतात्या, बंडुनाना हीं नांवें ते कधींहि विसरणें शक्य नाहीं. रा. खांडेकर यांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें, " स्वभावाच्या दृष्टीनें कोल्हटकरांनीं निर्माण केलेलीं पांडुतात्या व बंडुनाना हीं पात्रें इतकीं चिरं-

जीव झालीं आहेत, कीं तीं नांवें असणाऱ्या मनुष्यांना दत्तक होऊन नांव बदलून घेण्याची इच्छा उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. ”

## लघुकथा.

‘ **गाणारें यंत्र,** ’ ‘ पति हाच स्त्रीचा अलंकार, ’ ‘ संपादिका ’ व ‘ गरीब बिचारें पाडस ’ अशा चार गोष्टी त्यांनीं लिहिल्या असून, ‘ **कथासप्तक** ’ नांवाच्या पुस्तकांत त्या एकत्र प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत. नाटकांप्रमाणेंच श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठ काव्यात्मता यांत प्रगट झाली आहे. विशेषतः ‘ गाणारें यंत्र ’ ही गोष्ट अशा प्रकारची आहे. कल्पना, भावना व काव्यात्मता यांचा यांत आढळून येणारा मधुर मिलाफ मराठी लघुकथेंत क्वचित् दिसून येतो. ‘ यांतील पहिल्या दोन सुवर्णकंकणासारख्या तर दुसऱ्या दोन मोहनमाळेप्रमाणें भासतात. पुष्करिणी व निर्झरिणी, लतिका व वृक्ष, यांच्या उपमा या कथायुगुलांना अनुक्रमें देतां येतील, ’ असें जें त्यांच्या ‘ आदर्श ’ नांवाच्या टीकाकारानें म्हटलें आहे तें यथार्थ वाटतें. या चार गोष्टींत आणखी एका गोष्टीची भर घालून ‘ कथापंचक ’ किंवा ‘ कथापंचनद ’ या नांवानें त्या एकत्र प्रसिद्ध कराव्या असा त्यांचा मूळ हेतू होता व त्याप्रमाणें ते पांचवी लघुकथा लिहावयास बसलेहि. पण ही कथा वाढतां वाढतां एवढी वाढली कीं, तिनें लघुकथेचा ठराविक परिकर ओलांडून बृहत्कथेचें स्वरूप धारण केलें. झुळझुळ वाहत चाललेल्या निर्झरांत अनेक प्रवाहांचे फांटे मिळून, त्याला जसें महानदाचें स्वरूप प्राप्त व्हावें तशा तऱ्हेची या कथेची स्थिति झाली. ही कथा म्हणजे रा. नारायण हरि आपटे यांनीं प्रकाशिलेली ‘ **श्यामसुंदर.** ’ कादंबरी होय. आपला इच्छित हेतु साध्य झाला नाहीं हें पाहून, ते पुन्हां दुसरी लघुकथा लिहावयास बसले पण तिचीही गत पहिलीसारखीच झाली. या कथेचें नांव ‘ **दुटप्पी कीं दुहेरी.** ’ पुन्हां तिसऱ्यांदा मात्र त्यांनीं प्रयत्न केला नाहीं, आणि तो केला असता तर या दोन कादंबऱ्यांच्या जोडीला आणखी एक तिसरी उत्कृष्ट कादंबरी बसलेली पाहण्याचें भाग्य महाराष्ट्रास खास लाधलें असतें.

## कादंबऱ्या.

वरील दोन कादंबऱ्यांपैकीं ‘ **श्यामसुंदर** ’ ही सामाजिक असून ‘ **दुटप्पी कीं दुहेरी** ’ ही वाङ्मयविषयक आहे. या दोन्ही कादंबऱ्या म्हणजे श्रीपाद कृष्णांच्या सामर्थ्यवान रसवतीचे सोज्वळ नमुने आहेत. त्यांचें सारें ध्येयवादित्व,

सारी काव्यात्मता, सारी सौंदर्याकुलता यांत प्रगट झाली आहे. या कादंबऱ्यांना कादंबरीचा उत्कृष्ट नमुना असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी वाङ्मयाचा उत्कृष्ट व आदर्श नमुना असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

'दुटप्पी कीं दुहेरी' व 'श्यामसुंदर' या दोन्ही कादंबऱ्यांचीं कथानकें नावीन्यपूर्ण आहेत. रम्य अद्भुतत्व हा कोल्हटकरांच्या प्रतिभेचा विशेष असल्यामुळें हरिभाऊ अगर देवल यांच्यासारखीं सामाजिक चित्रें त्यांत आढळत नाहींत, याबद्दल आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. सामाजिक सुधारक हरिहरराव व राजकीय चळवळ्या कौंतेय या दोन व्यक्ति एकच असणें अगर श्यामनें साधु होऊन राहणें या गोष्टी मुक्या सेवकाच्या वेषानें राजपुत्र विक्रांतानें राहण्यासारख्याच नाहींत काय ? 'Discussion is the test of a play-wright' असें शॉ म्हणतो. कादंबरीकार हा नाटककाराचा भाऊच असल्यामुळें त्यालाहि हा नियम लावावयाला हरकत नाहीं. या नियमाप्रमाणें पाहिलें तर कोल्हटकरांच्या दोन्ही कादंबऱ्यांत वाचकांच्या विचाराला भरपूर खाद्य देणारे वादविवाद आले आहेत. त्यांच्या या कादंबऱ्यांची भाषा अनेक ठिकाणीं गद्यमय काव्यासारखी असून अल्पविस्तर पण बव्हर्थ वाक्यें लिहिण्याची त्यांची शक्ति त्यांत प्रकर्षानें प्रगट झालेली आढळेल. 'दुटप्पी कीं दुहेरी' मध्यें राजकारण व वाङ्मय या विषयांवरील त्यांचे अनुभवाच्या मुशींत तावून सुलाखून निघालेले विचार व्यक्त झाले आहेत, तर 'श्यामसुंदर' मध्यें अस्पृश्योद्धारासाठीं तळमळणारें त्यांचें हृदय दलित वर्गाची वकिली करीत आहे. 'श्याम' च्या द्वारानें तरुणपिढीपुढें त्यांनीं समाजसेवेचा एक उज्वल आदर्श ठेविला असून सुंदराबाईचें मातृहृदय रेखाटून त्यांनीं त्या कादंबरीला रसाळपणा आणिला आहे. त्यामुळें रूपानें दहाजणींसारख्या पण बुद्धीनें असामान्य असणाऱ्या मुलींप्रमाणें त्यांच्या कादंबऱ्या वाटतात. या दोन्ही कादंबऱ्यांचीं परीक्षणें 'विविधज्ञानविस्तारांत' प्रो. वा. म. जोशी यांनीं मोठ्या मार्मिकपणें केलीं आहेत.

## कविता.

विनोदी लेखांच्या किंवा टीकात्मक लेखांच्या संख्येच्या मानानें त्यांच्या कवितांची संख्या फारच अल्प ( १६ ) आहे. या सर्व, दादरच्या गोविंदाग्रज मंडळानें '**गीतोपायन**' या नांवानें पुस्तकरूपानें एकत्र प्रसिद्ध केल्या आहेत.

कालाच्या दृष्टीनें श्रीपाद कृष्णांच्या कविता केशवसुतांच्या युगांतील आहेत; पण त्यांच्या स्फूर्तीचा उगम शेले–बायरन–वर्डस्वर्थ–टेनिसन यांच्या कामगिरींतून झालेला दिसत नाहीं. महाजनि कानिटकरांप्रमाणें त्यांनीं इंग्रजी चुटक्यांचीं भाषांतरें केलीं नाहीं; त्यांच्या सर्व कविता स्वतंत्र असून त्यांतील कल्पनाविलास कौतुकास्पद आहे. ‘ एका स्त्रीची पर्जन्यविषयक कल्पना ’ व ‘ सुखकर जागृति ’ यांतील कल्पना सुंदर व रसपूर्ण आहेत. ‘ तुळशीचें लग्न, ’ ‘ भयंकर जागृति, ’ ‘ अंत्यजाष्टक ’ इत्यादि कविता सामाजिक असून त्यांत सुधारणावादाचा पुरस्कार केलेला आहे. कोल्हटकरांच्या समकालीन कवींत सहसा न आढळून येणारा मधुर नर्मविनोद ‘ तुळशीचें लग्न, ’ ‘ सुखकर जागृति ’ व ‘ भयंकर जागृति ’ या कवितांत आढळतो. त्यांच्या कवितेनें नवीन असा संप्रदाय निर्माण केला नसला तरी तिचें तेज स्वयंभू आहे. त्यांच्यांतील विशिष्ट विनोददृष्टीमुळें त्यांना विपुल भावनापर काव्यें लिहिणें फारसें शक्य नव्हतें. पण कल्पकता व सौंदर्यदृष्टी यांचा संगम झाल्यामुळें त्यांच्या कविता केव्हांहि वाचनीय वाटतील.

## टीकात्मक व चर्चात्मक लेख.

टीकात्मक व चर्चात्मक लेखांची संख्या ४२ असून ते एकत्र केल्यास त्यांचें ५००–६०० पानांचें एक मोठें पुस्तक होईल. यांतील कांहीं बिननांवानें, बरेचसे टोपण नांवानें व कांहीं थोडे नांवानें प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व निबंधांतून टीकाकाराला आवश्यक असे बहुश्रुतपणा, निःपक्षपातीपणा, ध्येयवादित्व वगैरे गुण प्रगट झाले आहेत. मराठी वाङ्मयांत उत्कृष्ट टीकात्मक वाङ्मय असें फारसें नाहीं. आगरकर, चिपळुणकर यांच्या लेखण्यांतून बरेच टीकात्मक लेख बाहेर पडले खरे, पण ते बरेच एककली असल्यामुळें टीकेचे ‘ **उत्कृष्ट** ’ नमुने असें त्यांना म्हणतां येणार नाहीं. टीकाकार हा मूर्तिकारासारखा असावा लागतो. मूर्तिकार दगडावर हातोड्याचे एकसारखे आघात करीत असतो. या आघातांच्या मुळाशीं, दगड छिन्नविच्छिन्न व्हावा हा हेतू नसून, त्याच्यांत देवपणा यावा, हा उच्च हेतू असतो. उत्तम टीकाकाराचें ध्येयहि असेंच उच्च असतें. पाषाणवत् समाजांत नवें चैतन्य उत्पन्न करून, त्याच्यांत देवपणा आणणें हेंच तो आपलें अंतिम ध्येय समजत असतो. श्रीपाद कृष्ण हे अशा टीकाकारांपैकीं एक आहेत. टीकाकार होऊं इच्छिणाऱ्यांनीं त्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवावें, त्यांच्या वाङ्मयाचा निष्ठापूर्वक अभ्यास करावा, त्यांची सरस्वतीमाईपाशीं झालेली तीन तपांची तपश्चर्या ध्यानांत आणावी. औट घटकेंत माणसाला श्रेष्ठत्व प्राप्त होत

नसतें; त्याच्या पाठीशीं कित्येक वर्षांची खडतर तपस्या असावी लागते. श्रीपाद कृष्णांच्या श्रेष्ठत्वाच्या मुळाशीं जर कोणती गोष्ट असेल, तर ती ही तपस्याच होय. स्वतः कष्टत जाऊन त्यांनीं नव्या पिढीला नवा मार्ग, नवी दिशा हीं दाखवून दिलीं आहेत. त्या मार्गानें जाऊन, त्यानीं दाखवून दिलेलें ध्येय गांठणें, हें आजच्या पिढीचें एकमेव कर्तव्य आहे.

# सामाजिक व राजकीय विचार

## सामाजिक विचार

श्रीपाद कृष्णांचें वाङ्मय म्हणजे सामाजिक विचारक्रांतीचा एक तेजस्वी इतिहास आहे. आगरकरांनंतर त्यांच्या एवढे सामर्थ्यवान् क्रांतिपूर्ण विचार कोणाच्याहि लेखणींतून बाहेर पडले नाहींत. त्यांचे टीकात्मक निबंध–विशेषतः कै. गोळे यांच्या ‘ हिंदुधर्म आणि सुधारणा ’ या पुस्तकावर केलेली टीका–जो वाचील त्याला आमचें हें म्हणणें पटल्यावांचून राहणार नाहीं. या निबंधांत ‘ बालविवाह ’ ‘ प्रीतिविवाह ’, ‘ पुनर्विवाह ’ यांवरील रूढीप्रिय लोकांच्या मतांचें त्यांनीं केलेलें खंडण प्रत्येक प्रगतिप्रिय तरुणानें वाचण्याजोगें आहे. कोल्हटकरांच्या लेखणीचें टोंक किती तीक्ष्ण व मर्मभेदक असतें याची पूर्ण कल्पना जर कोणाला करून घ्यावयाची असेल, तर त्यानें हा निबंध अवश्य वाचावा. यांतील कांहीं विचार मासल्यादाखल पुढें उद्धृत करीत आहें.

“ प्रथम बालविवाहासंबंधानेंच विचार करूं. ग्रंथकाराचें ( गोळे यांचें ) पहिलें विधान असें आहे कीं, मुलगी दोन तीन वर्षांची असते तेव्हांपासून तिच्या हृदयांत प्रेमाचा अंकुर हळूहळू वाढत असतो. याला प्रमाण कोणतें तर ‘ तिच्या बाहुल्या, तिचे खेळ, तिची तान्ह्या मुलाविषयींची प्रीति ’ वगैरे. आम्हांस तर या सर्व गोष्टींत तिच्या भावाप्रमाणेंच दांडगी अनुकरणेच्छा मात्र दिसून येते. मनुष्याची माकडापासून जी उत्क्रांति झाली तिच्या सर्व पायऱ्या क्रमाक्रमानें बालपणापासून प्रौढ दशेपर्यंत मनुष्यामध्यें दिसून येतात, हा आधुनिक विद्वानांचा अनुभव आहे. लहान मुलें–मुलगे किंवा मुली–फार क्रूर असतात हें कोणाही सूक्ष्मदृष्टीच्या प्रेक्षकास तेव्हांच दिसून येईल. पुरुषांना काय किंवा स्त्रियांना काय, दया ही शिक्षणानेंच प्राप्त होत असते. एखादी स्त्री आपल्या तान्ह्या बाळकास गोंजारतांना पहूना ज्याप्रमाणें एखाद्या मर्कटीनें आपल्या पिलांशीं हुबेहुब तसें वर्तन ठेवावें,

त्याप्रमाणेंच लहान मुलीनें भातुकलींत थोरपणाचा आव आणणें होय. मुलगा आपल्या कृतींत जसें बापाचें अनुकरण करितो, त्याचप्रमाणें मुलगी आईचें करते. लुटुपुटूच्या कागदावर ऐटीनें शेरे देणाऱ्या मुलास ज्याप्रमाणें न्यायासनाची कल्पनाही नसते, त्याप्रमाणें बाहुलाबाहुलीचें लग्न करितांना मुलीसही सात्त्विक प्रेमाची नसते. दोन्ही बोलून चालून खेळ. बाहुलीस घट्ट पोटाशीं धरितांना मुलीला प्रेमाच्या गुदगुल्या होत असतात असें म्हणणें आणि तिच्या स्तनांत मातृप्रेमामुळें दुग्धोद्भव होत असतो असें म्हणणें सारखेंच समंजसपणाचें किंवा हास्यास्पद. अशा प्रसंगीं बाह्य कृतींचा मनोवृत्तींशीं कांहीं संबंध नसतो. मुलीचा उद्देश केवळ आपल्या आईचें किंवा हजारों पिढ्यांपूर्वींच्या आपल्या आजीबाईचें अनुकरण करण्याचा असतो."

" अशा काल्पनिक प्रेमांकुराची मुलीच्या हृदयांत स्थापना करून ग्रंथकार मातापितरांस त्यांस सुदिशा लाविण्याविषयीं कळकळीनें उपदेश करितात. हा त्यांचा उपदेश स्तुत्य आहे खरा. पण सुदिशा लावणें म्हणजे चतुर्भुज करणें हा अर्थ त्यांतून कसा निघतो तो त्यांचा त्यांनाच माहीत. मुलीला अविवाहित ठेविल्यानें तो प्रेमांकुर होरपळून जातो असा ग्रंथकारांचा आशय आहे कीं काय ? तसा आशय असेल तर ग्रंथकारांचा तो निव्वळ भ्रम आहे असें आम्हीं बेधडक म्हणतों. मातापितरांच्या मध्यस्थीवांचून ज्या प्रेमाचा उद्भव झाला, जें प्रेम आठ वर्षें बाहुल्यांच्या चुंबनावरच जीव धरून राहिलें तें आठव्या वर्षीं मुलीचें लग्न न झाल्यास आपल्या आवडत्या बाहुल्यांस अनाथ करून उडून जाईल हें संभवतें तरी का ? त्याचा आणखी चार-पांच वर्षें बाहुल्यांवर किंवा मातापितरांवर निभाव लागणार नाहीं का ? त्या प्रेमाला टिकाव धरून रहाण्याला एखादी लाकडाची पुतळी किंवा तितक्याच उंचीचा खराखुरा नवरा अवश्य लागतोच कीं काय ? आणि मातापितरांचा किंवा भावंडांचा खुराक लाविला असतां तें मृत्युपंथाला लागावयाचेंच कीं काय ? "

" यानंतर बापूसाहेबकृत प्रेमांकुराच्या वाढीचा इतिहास आला आहे तो **गिबन**कृत रोमन राज्याच्या नाशाच्या इतिहासाइतका बोधप्रद जरी नाहीं, तरी त्याच्याहून लाखपटीनें हास्यरसप्रचुर आहे. प्रेमाच्या इमारतीस अवश्य लागणाऱ्या मालमसाल्यानें या ग्रंथाचीं दोन तीन सबंध पृष्ठें अडविलीं आहेत. त्यांपैकीं प्रमुख साहित्यें म्हटलीं म्हणजे तीं हीं होतः—पुढील वर्तन कसें ठेवावयाचें याबद्दल विनयाचे बेत, चटकन् नवऱ्याकडे पाहणें, पुनः खालीं मान घालणें, लग्नांतील

चार दिवसांचें संघट्टन, मान मुरकणें, धोतरांच्या निऱ्या करणें, झटकन् शेजारून निघून जाणें, ' इश्श बाई ' वगैरे उद्गार, खुदकन् हंसणें, उखाणा घेणें, वेणीफणी उत्तम करून दागदागिने घालून झळकणें, ' गर्भाधानाचा धार्मिक (?) विधि झाल्यानंतर ' स्पर्शमात्रास राजी न होणें, या मसाल्यापैकीं धोतराच्या निऱ्या करणें, खुदकन् हंसणें वगैरेंचा प्रेमाच्या वाढीस होणारा उपयोग जगजाहीर आहे. धोतराच्या प्रत्येक निरीबरोबर किंवा खुदकन् हंसण्याच्या लकेरीबरोबर प्रेमाची इमारत हातभर वाढत जाते हा सार्वत्रिक अनुभव आहे. पण वरील मसाल्यांत वधूवरांच्या डोळ्यांतील चिपडाचें किंवा नाकांतील शेंबडाचें लुकण सांगण्यास ग्रंथकार कसे विसरले याचें नवल वाटतें ! "

" वरील मसाल्यापैकीं बराच भाग प्रौढ वधूच्याहि आटोक्यांतला आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. कदाचित् अवयवांच्या भरदारपणामुळें लहान वधू-इतका मोठा कोन साधून तिला मुरका न मारितां आल्याकारणानें किंवा अंगच्या नैसर्गिक भारदस्तपणामुळें खुदकन् हंसण्याच्या पंचमाबद्दल मंदहास्याचा षड्ज निघाल्याकारणानें जी हानि होईल तेवढीच काय ती. "

" यानंतर प्रीतीचा आणि व्यावहारिक फायद्याचा असे विवाहाचे दोन प्रकार कल्पून हिंदु लोकांच्या विवाहांत वरील दोन्ही प्रकारांतील हेतु साधतात असें विधान बापूसाहेबांनीं केलें आहे. व्यावहारिक फायदा बालविवाहाच्या योजनेंत कसा उत्पन्न होतो तो पहा—' वराची व त्याच्या कुटुंबाची सुस्थिति पाहण्याचें काम अधिक अनुभविक मातापितरांकडे गेल्यानें व्यावहारिक फायदा होतो.' एकूण स्वतः वराची बुद्धि, अक्कल, नीतिमत्ता यांजकडे मुळींच पहावयास नको वाटतें ? नव-कोट नारायणाचे उधळे चिरंजीव थोड्याच वर्षांत आपल्या कमकुवतपणामुळें धुळीचे दिवे लावावयास लागतात, हें ग्रंथकारांना माहीत नाहीं वाटतें ? नुसत्या मातापितरांच्या सुस्थितीकडे लक्ष्य पुरविल्यानें व्यावहारिक फायद्याची खात्री देतां येईल, कीं मुलगा मिळविता झाल्यावर त्याच्या शहाणपणाकडे पाहून देतां येईल ? प्रीतीचा उद्भव वर्णितांनाहि ग्रंथकारानें अशींच वेंगरूळ प्रमाणें पुढें आणिलीं आहेत. ' प्रेमाचा अंकुर फार दिवस पोसल्यानें तोही बळावतो. ' पोसल्यानें बळावतो हें आम्हांसही कबूल आहे. पण वधूवरांकडून पोसला गेला पाहिजे ना ? ज्यांनीं साऱ्या जन्मांत ( सारा जन्म म्हणजे सारा आठ दहा वर्षांचाच हो ! ) एकमेकांस काळें का गोरें हें पाहिलेंदेखील नाहीं, अंतरपाट खालीं होण्याच्या अगोदर डोळा वांकडा करून एकमेकांकडे पाहण्याची ज्यांना चोरी, अशा अर्भ-

कांना लांबून पकडून आणून त्यांची घट्ट गांठ बांधणाऱ्या आणि नंतर 'आतां प्रेमाचा अंकुर चांगला पोसून वाढवा बरें!' अशी त्यांना निक्षून ताकीद देणाऱ्या मनुष्यास मूर्ख म्हणावें कीं अधम म्हणावें याचीच पंचाईत. सोंगट्यांत ज्याप्रमाणें दोन ढिगांतील कोणत्याही दोन चिठ्ठ्या उचलून त्यांचा परस्परांशीं संबंध लावितात, त्याप्रमाणें वधू आणि वर एके ठिकाणीं आणिल्यानें त्यांचें प्रेम एकमेकांवर जडतें असें गांभीर्यानें प्रतिपादन करणें म्हणजे तर्कशास्त्राचा कडेलोट करणेंच होय. यापेक्षां त्या बिचाऱ्या लेंकरांची अंधळी कोशिंबीर काय वाईट? तिच्यांत ज्या मुलावर राज्य असतें त्याचे डोळे बांधून नंतर तो ज्याला शिवेल त्यावर राज्य येत असतें. पण बालविवाहाचा प्रकार कांहीं निराळाच. वराचे आजोबा वधूस पहावयास निघतात आणि वधूच्या आजोबाची भेट घेतात. सौंदर्य, गुण वगैरे ज्या मुख्य गोष्टी पहावयाच्या त्यांकडे डोळेझांक करून ( ही डोळेझांक व्हावयाला आजोबांचें अंधत्व आणि वधूच्या गुणांची अपूर्णावस्था हीं दोन्हीं कारणें होतात. ) हुंडा, मानपान वगैरे क्षुल्लक गोष्टींकडे बारकाईनें लक्ष्य पुरवून शेवटीं स्थलनिश्चय होतो. अर्थात् या विवाहाशीं ज्यांचा जन्माचा संबंध तीं अर्भकें या प्रकारानें एका बाजूसच राहून, ज्यांचा या मृत्युलोकाशीं फार तर दोन चार वर्षांचाच संबंध असणार अशा गृहस्थांकडे प्रमुखत्व दिलें जातें. बरें, इतकेंहि असून जर का वधूवरांचें प्रेम एकमेकांवर जडेनासें झालें तर लागलींच आजोबा वस्सकन अंगावर येऊन म्हणावयास तयार कीं 'कारट्यांनों, आम्हीं आमचें कर्तव्य करून चुकलों. हुंडा, करणी, मानपान वगैरेकडे लक्ष्य पुरविण्यांत काडीइतकी तरी कसूर झाली का? मुख्य गोष्टी आम्हीं सर्व पाहिल्या आहेत. आतां प्रेम जडण्याचेंच काय तें राहिलें आहे? तुम्ही आपलीं शस्त्रास्त्रें पाजळण्याचें सोडून गप्प काय बसलांत? मुरके मारा, निऱ्या करा, 'इश्श बाई' म्हणा, निदानींचें खुद्कन् हंसाल तर खरें? म्हणजे पहाल प्रेमाचा लोंढा तुम्हांला आवरतो कीं काय तें.' याच आजोबांवर, समाजाच्या दुर्दैवानें आणि त्यांच्या सुदैवानें, जर का चवथा किंवा पांचवा विवाह करावयाची पाळी आली तर वधूचें रूप वगैरे पाहण्यांत ते तरण्या बांडासही मागें सारतील! असो, कोळसा उगाळावा तितका काळाच."

"ग्रंथकारांची वैवाहिक प्रेमाची कल्पना फारच विलक्षण आहे. त्यांच्या मतें प्रेम ही वस्तु कापरासारखी उडून जाणारी आहे. जर का तिच्यावर लज्जेचें दडपण असेल तरच ती या मृत्युलोकांत वास्तव्य करील; नाहींतर भुरकन् आकाशांत उडून जाईल. ही कल्पना ग्रंथकारांस कदाचित् पाश्चात्य चित्रकारांनीं काढिलेल्या

मदनाच्या चित्रावरून सुचली असावी. त्यांतील मदनाला पंख पाहून ग्रंथकारांनीं आपल्याहि प्रेमविषयक कल्पनेला फांटे फोडिले असावेत !"

" ग्रंथकारानें बालविवाहावरील जे थोडे आक्षेप ग्रंथांत देऊन त्यांचें निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे ते सर्व मिळून एकंदर आणितां येण्यासारख्या आक्षेपांचा अल्प अंश होत. एक तर वधूवर लहान असल्यामुळें त्यांचे स्वभाव पक्वदशेप्रत आलेले नसतात, त्यामुळें परस्परांच्या स्वभावांतील वैषम्य विवाहाच्या वेळीं दिसून येत नाहीं; पण जों जों दोघें वयानें वाढत जातात, तों तों तें अधिकाधिक दिसून येऊन उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या असंतोषास कारण होतें. लहानपणीं वधूवरांच्या दृष्टीस एकमेकांचे दोषच पडत असल्यामुळें परस्परांविषयीं सन्मानबुद्धि कितीशी जागृत राहत असेल याचीही शंकाच आहे."

" आपणामध्यें हल्लीं जो दैववाद हाडीं पिंडीं खिळून गेला आहे तो बालविवाहाचेंच अपत्य होय. विवाह म्हणजे आयुष्यांतील अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. बायको जशी मिळेल त्याप्रमाणें संसार गोड किंवा कडू व्हावयाचा, मुलें सशक्त किंवा रोगी निपजावयाचीं, त्यांचें शिक्षण पूर्ण किंवा अपूर्ण व्हावयाचें, नवरा संपन्न किंवा कर्जबाजारी व्हावयाचा. फार कशाला ? हल्लीं बोलके सुधारक आणि कर्ते सुधारक असा जो भेद निघाला आहे त्याच्या मुळाशीं पाहूं गेलें, तर गृहिणीच सांपडावयाची. अशी जी आयुष्यांतील सुखदुःखांचें नियमन करणारी देवता ती जर पुरुषास कळूं लागण्यापूर्वीं, त्याची संमति न घेतां परक्यांनीं निवडून त्याच्या शिरावर लादली, तर विचारस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य यांवरील त्याची निष्ठा उडून तो दैवाचा बंदा गुलाम बनल्यास नवल नाहीं."

" आतां पुनर्विवाहाचा विचार करूं. या ग्रंथांतील यासंबंधाचा भाग वाचतांना सामान्य वाचकाच्या चित्तावर हजारों दुःखाचे तरंग उठतात. प्रथमतः विधवेची अनाथ आणि करुणरसपूर्ण मूर्ति डोळ्यांसमोर उभी राहते. या दुर्दैवी प्राण्यानें असा कोणता अपराध केला होता कीं, तिचें सौभाग्य नष्ट होतांच तिच्या दुःखावर डाग देण्याकरितांच कीं काय, तिच्या आप्तांनीं तिचें सौंदर्य हिरावून हातीं पोळपाट लाटणें देण्याला तयार व्हावें ? ज्या चांडाळहृदयी भिक्षुकानें मधल्यामध्यें पैसा खावून एखाद्या बालिकेस एका थेरड्याच्या गळयांत बांधून तिजवर अकालीं वैधव्य आणलें, तोच अधमाधम मंगलविधीमध्यें श्रेष्ठ गणिला जाऊन त्याच बालिकेचें दर्शन होतांच अपशकून समजतो ! एखादें मांजर समोर आलें कीं जितका उत्साहभंग होत नाहीं, तितका विधवेचें तोंड दिसतांच होतो ! स्वतःच्या एकुलत्या

एक मुलाचा विवाहविधी कौतुकानें पहाण्याकरितां वोहल्यापर्यंत येण्याचीही त्या वापडीला चोरीच ! अशा अपेष्टेमध्यें जर का त्या बिचारीचें वांकडें पाऊल पडलें तर तिची दैना विचारावयासच नको. जो समाज तिच्या दुराचरणाबद्दल सर्वथा जबाबदार तोच तिची विटंबना करण्यांत प्रमुखत्वानें वागतो ! शेवटीं आईबापां-कडून विषप्रयोग होऊन, स्वतः विहिरींत उडी टाकून, किंवा बालहत्या झाली असल्यास फांसावर लटकून तिच्या दुःखपूर्ण जीविताचा अंत होतो ! ”

“ पतिप्रेमाबद्दल दुसऱ्या तऱ्हेचें प्रेम मिळाल्यास विधवा संतुष्ट रहातील असा एक सिद्धांत या ग्रंथांत प्रस्थापित केला आहे. हा सिद्धांत ग्रंथकर्त्यास कोठें गवसला कोणास ठाऊक ! पुरुषांमध्यें पाहिलें तर वाचनाचा अतोनात हव्यास असलेले गृहस्थसुद्धां विवाह करण्यास हौशीनें तयार होतात. घरांत स्वतःची बालविधवा कन्या असूनहि तिला सुख देण्याचें सोडून वृद्ध पिते तिजपेक्षांही लहान वधूस आपल्या सुरकुतलेल्या मांडीवर ओढण्यास उल्लू झालेले दृष्टीस पडतात. पुरुषांमध्यें जर ही स्थिति, तर स्त्रियांमध्यें निराळी कां असावी ? त्याचप्रमाणें, हिंदु दंपत्यास स्वतंत्र स्त्रीची आवश्यकता असते म्हणून विधवा पुनर्विवाहास राजी होणार नाहीं, या वाक्याचा अर्थ काय ? एकाची आवडनिवड दुसऱ्याच्या गरजेवर अवलंबून असते कीं काय ? विधवांनीं पुनर्विवाह न केल्यानें समाजास कोणते फायदे होतात हें दाखवितांना हे गृहस्थ आपलें सर्व गणिती ज्ञान ओतून म्हणतातः—हिंदु समाजांत सरासरीनें ८०००० कुटुंबें आहेत. यांमधील दांपत्यस्थितींतील स्त्रियांना बाळंत-पणाखातर १६००० विधवांची गरज लागते. अशा स्त्रियांच्या मृत्यूमुळें २००० विधवांची टंचाई वाटूं लागते. आजारी मुलांच्या शुश्रूषेकरितां २००० विधवांचा तरी पुरवठा पाहिजे. त्याप्रमाणेंच कुटुंबवत्सल स्त्रियांच्यामागें पोरांचें खिल्लार लागलें म्हणजे त्यांना दळण्याकांडण्याकडे पहाण्यास फुरसद नसते. याशिवाय विटाळशीपण वगैरे गोष्टी ध्यानांत घेतल्या म्हणजे दर कुटुंबाला एक विधवा याप्रमाणें ८०००० कुटुंबांना ८०००० विधवा अवश्य आहेत. आतां निरंतर वैवाहिक सुखांत लोळ-णाऱ्या दंपत्यांना वैधव्यांत पोळणाऱ्या विधवांची आवश्यकता वाटली म्हणजे विध-वांनीं एका पायावर तयार असलें पाहिजे, हें तर या भागांतील पहिलेंच सूत्र. त्याअर्थी विधवांचें ब्रह्मचर्य हेंही त्या मागोमाग आलेंच ! ”

“ वरील तत्वानुसार प्रत्येक कुटुंबांत दोन पुरुष व तीन स्त्रिया असाव्या अशी इच्छा या रुधिरप्रिय लेखकानें प्रदर्शित केली असून, लागलीच या प्रमाणानें स्त्रियांची संख्या नसल्याकारणानें खेद प्रदर्शित केला आहे. आणखी कांहीं पुरुष पर-

लोकवास पत्करून आपल्या विधवा निमूटपणें इतर दंपत्यांच्या हवालीं करतील तर या लेखकाचा हर्ष त्रिभुवनांत मावणार नाहीं ! मात्र हे उपकारी गृहस्थ सुधारक असतां कामाचे नाहींत ! कारण त्यांच्या स्त्रियांनीं पटापट पुनर्विवाह करून टाकिले म्हणजे सगळेंच बिनसलें. या कामाला धर्माभिमान्यांनींच कंबर बांधून पुढें आलें पाहिजे ( म्हणजे वर–स्वर्गांत–गेलें पाहिजे ) ! ”

**“ किती भयंकर आणि उलट्या काळजाची सूचना ही ! कुटुंबांतील चार जणांचें स्वास्थ्य रहाण्यासाठीं एक जणानें दुःखांत राहिलें पाहिजे ! एका जोडप्याची पुष्पशय्या सजविण्यासाठीं एका विधवेनें शरपंजरीं पडलें पाहिजे ! दांपत्यस्थितींतील एका स्त्रीस आराम वाटावा म्हणून दुसऱ्या स्त्रीनें कपाळचें कुंकूं पुसून, हातच्या बांगड्या फोडून, केंसास रजा देऊन गुलामासारखें खपण्यास तयार झालें पाहिजे ! समाजांतील अर्ध्या बायकांना पतिसुख मिळण्याकरितां अर्ध्या बायकांनीं पतिविरह भोगला पाहिजे ! वहावा रे तादात्म्यशक्ति ! वहावा रे दया ! ! वहावा रे प्रेम ! ! ! ”**

“ अशीं तत्वें एकत्र करून सादर केलेल्या ग्रंथाची ज्या समाजाकडून संभावना केली जाते, त्या समाजाला गुलामगिरीसारख्या संस्थेस हंसण्याचा काय हक्क राहिला ? किंवा ‘ आमच्या सुखाकरितां तुम्हीं निरंतर हालअपेष्टांत दिवस काढिले पाहिजेत ’ असें म्हणून जर इंग्रज सरकारनें उद्यां पाठीवर चाबूक मारमारून आम्हांला काम करावयास लाविलें, तर कुरकुर करावयाला जागा कुठें राहिली ? ज्या मुखानें राष्ट्रीयसभेच्या अग्रस्थानीं स्वतःचे हक्क परकीयांनीं पाळावे म्हणून कंठरव करावयाचा, त्याच मुखानें आपल्या गृहांतील अनाथ अबलांच्या हक्कांची पायमल्ली करावयाची ! ज्या अधमास उंबरठ्याच्या आंतील पोटच्या गोळ्याचें दुःख कळण्याइतकी अक्कल नाहीं, तोच येथून ४००० मैलांवर जाऊन आपले राजकीय हक्क स्थापूं पहातो ! धिःकार असो मनुष्याच्या आपलपोटेपणास ! धिःकार असो मनुष्याच्या दुराग्रहास आणि त्याच्या निरर्थक पांडित्यास ! ”

सदर उतारा श्रीपाद कृष्णांच्या ज्वलज्जहाल सामाजिक विचारांची कल्पना आणून देईलच पण त्याचबरोबर तत्कालीन रूढीप्रिय धर्ममार्तंडांच्या अंतरंगाचीहि ओळख करून देईल.

जातिभेद, स्पृश्यास्पृश्यभेद, विषमविवाह, याबावतींत त्यांचे विचारही आजच्या कोणत्याही ज्वलज्जहाल सुधारकांपेक्षां अधिक उदार आहेत.

## राजकीय विचार

श्रीपाद कृष्ण सामाजिक सुधारणांच्या बाबतींत जेवढे ज्वलज्जहालवृत्तीचे आहेत तेवढेच ते राजकीय बाबतींत नेमस्त आहेत. ही त्यांची नेमस्तवृत्ति इतर नेमस्तांहून बरीच भिन्न आहे. जहालांचीं वरीचशीं ध्येयें त्यांना मान्य आहेत पण तीं साध्य करण्याचे मार्ग मात्र त्यांना सर्वस्वी पसंत नाहींत. लोकमान्य टिळकांसारख्यांनीं घडवून आणलेली राजकीय क्रांती त्यांना मान्य असून, ते त्याकडे आदरपूर्वक पहात असतात. रावसाहेब रानड्यांबद्दल जसा त्यांना आदर वाटतो, तसा त्यांना टिळकांबद्दलही वाटतो. ह्या दोघांना ते अनुक्रमें हिमालयाची व ताजमहालाची उपमा देत असतात. 'दुटप्पी कीं दुहेरी' या आपल्या कादंबरींत हरिहररावांच्या तोंडून नेमस्त व जहाल यांसंबंधीं प्रगट केलेले पुढील विचार त्यांच्या राजकीय मतांची पूर्ण जरी नाहीं, तरी आंशिक कल्पना आणून देतात. "जहाल व नेमस्त हे पक्ष एकमेकांचे पूरक आहेत. सामाजिक सुधारणेमुळें भिन्न भिन्न जातींत जी एकी व समान हक्कांची जाणीव होते तिची राजकीय सुधारणेच्या प्रगतीस चांगलीच मदत होते, व जहालांकडून राजकीय हक्कांची जी मागणी होते तिचेंही समाजांतील भिन्न भिन्न वर्गांत समानतेची भावना उत्पन्न व जागृत होण्यास उत्तम साहाय्य होतें. राष्ट्रांत सगळेच सुधारक व नेमस्त किंवा सगळेच पुराणाभिमानी व जहाल असते तर सरकारनें प्रजेस आपण होऊन राजकीय हक्क कधींच दिले नसते. पण ते दोन पक्ष अस्तित्वांत असल्यामुळें त्यास तडजोड म्हणून अधिकारदानाचा देखावा तरी कधीं कधीं करावा लागतो. परस्परांशीं निकरानें झगडणाऱ्या या पक्षांत आपण दोघे भिन्न भिन्न मार्गांनीं एकाच उद्दिष्टाकडे जात आहोंत ही जाणीव होईल तर केवढें तरी कार्य होईल !"

टिळक व टिळकांची चळवळ यांप्रमाणेंच महात्मा गांधी व त्यांची चळवळ यांकडेही ते सहानुभूतीनें पहात आले आहेत. या चळवळींत भाग घेतलेल्या चंचल प्रवृत्तीच्या बहुसंख्याक लोकांबद्दल मात्र त्यांना यत्किंचितही आदर वाटत नाहीं. त्यांच्यांत आढळून येणाऱ्या बोल व कृति यांतील विसंगतीचा, त्यांनीं **श्यामसुंदर** या आपल्या कादंबरींत तीव्र शब्दांनीं उपहास केला आहे. ते म्हणतात, "मुत्सद्दी या नात्यानें महात्मा गांधी यांची योग्यता किती याबद्दल मतभेद असूं शकेल. पण त्यांची जाज्वल्य सत्यनिष्ठा, प्रचंड स्वार्थत्याग, साधी रहाणी, विमल आचरण, असामान्य निस्पृहपणा, शुद्ध व सदय अंतःकरण, लोकोत्तर धैर्य इत्यादि गुणांसंबंधानें या देशांतच काय, पण परदेशांतही मतभेद होण्याचा संभव नाहीं. त्यांनीं

राजकारणांत धर्माचा व नीतीचा प्रवेश करविला, श्रद्धा व बुद्धिमत्ता यांची सांगड घातली, व्यवहार व सत्य यांचा मेळ घातला, संपत्ति व साधेपणा यांचें ऐक्य घडवून आणलें आणि लोकांची निंदा करीत असतांही लोकप्रियता मिळविण्याचा अपूर्व चमत्कार करून दाखविला. त्यांनीं विश्वबंधुत्वाचा व प्रेमाचा उपदेश जितक्या परिणामकारक रीतीनें केला तितक्याच परिणामकारक रीतीनें असहकारितेचा व बहिष्काराचा उपदेशही केला. त्यांनीं खादीसारख्या असेव्य वाटणाऱ्या वस्तूला रेशमी व भरजरी वस्त्रांची योग्यता आणिली आणि अंत्यजांसारख्या अस्पृश्यांस स्पृश्य बनविलें. आजपर्यंत राष्ट्रीयसभा अल्पसंख्याक सुशिक्षित चाबुकस्वारांकडून चार दिवस ठरावांचे कागदी घोडे नाचवीत असे. पण महात्मा गांधींनीं नागपुरच्या राष्ट्रीय सभेच्या मुखानें सोडिलेल्या आज्ञा एका आठवड्यांत या अवाढव्य देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत वायुवेगानें जाऊन धडकल्या, आणि स्पष्ट उच्चार करूं शकणाऱ्या प्रत्येक मुलाच्या, तरुणाच्या व वृद्धाच्या मुखांत खादी, बहिष्कार, चरखा, स्वराज्य, खिलाफत हे शब्द खेळूं लागले. त्या आज्ञांचें आकलन व पालन सामान्य जनांस कठिण असल्यामुळें प्रत्येकजण त्यांचा अर्थ आपल्या बुद्धीप्रमाणें व मगदुराप्रमाणें निरनिराळा करूं लागला. हिंदु व मुसलमान हे कांहीं दिवस तरी परस्परांशीं अधिक सलोख्यानें वागले; पण स्पृश्य हिंदु वक्त्यांनीं अस्पृश्यता हा विषय अंत्यजांइतका अस्पृश्य मानणें पूर्ववत् चालू ठेविलें. सरकारी शाळांत मुलें न पाठविण्याचा निश्चय निपुत्रिकांकडून काय तो पूर्णपणें पार पडला. न्यायमंदिरांवरील बहिष्कार रिणकोनीं जितका तडीस नेला तितका धनकोनीं नेला नाहीं. धनकोनें रिणकोस न्यायमंदिराची पायरी चढावयास लाविलीच तर रिणको त्याचें देणें नाकबूल करून व इतर प्रकारेंही त्रास देऊन त्यास चांगलीच अद्दल घडवीत असे. एखाद्या धनकोस हुकूमनामा मिळविल्यानंतर वकिलांवरील बहिष्काराची आठवण होऊन वकील फी बुडवून तो बहिष्कार यथाशक्ति अंमलांत आणीत असे...... प्रत्येकानें स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीस पटेल तेंच करावें अशी एक सवलत महात्माजींनीं ठेविली होती. पण सदसद्विवेकबुद्धि कशाशीं खातात हें कळत नसल्यामुळें म्हणा, त्या सवलतीनें व्यक्तिस्वातंत्र्य मिळण्याऐवजीं अजीबात नष्ट मात्र झालें... स्वर्गांतून अवतरलेल्या निर्मल भागीरथीस पृथ्वीच्या संसर्गानें ज्याप्रमाणें पार्थिव व कलुषित स्वरूप प्राप्त झालें, त्याप्रमाणें महात्मा गांधींचे उदात्त व शुद्ध संकल्प सामान्य जनांच्या आचरणांत उतरतांच त्यांस ग्राम्य व शबल स्वरूप आलें."

श्रीपाद कृष्णांच्या सामाजिक व राजकीय विचारांचें स्वरूप थोडक्यांत हें असें आहे.

## समारोप

कोल्हटकरांचें मराठी वाङ्मयांतील स्थान अति उच्च दर्जाचें आहे. त्यांच्या समकालीन लेखकांत त्यांच्या एवढें बुद्धिवैभव ज्यांचें आहे व होतें असे लेखक म्हणजे रा. न. चिं. केळकर, प्रो. शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, प्रो. वा. म. जोशी व कै. हरिभाऊ आपटे हे होत. आधुनिक मराठी वाङ्मयाला अभिमानास्पद असें नवें वैभव जर कोणाच्या लेखनामुळें प्राप्त झालें असेल तर तें यांच्याच होय. इतकेंच काय पण अखिल भारतीय (Indian) वाङ्मयाला भूषण वाटेल असें यांचें वाङ्मय आहे. रवींद्रनाथ टागोरांच्या खालोखाल श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांएवढा अष्टपैलु बुद्धीचा प्रतिभावान् लेखक आजच्या हिंदी साहित्यसेवकांत आम्हांला तरी निदान एकही दिसत नाहीं.

श्री ग्रंथ संग्रहालय नं. ता.

# श्रीपाद कृष्णांचे ग्रंथ व लेख.

## नाटकें.

( १ ) वीरतनय, ( २ ) मूकनायक, ( ३ ) गुप्तमंजुष, ( ४ ) मतिविकार, ( ५ ) प्रेमशोधन, ( ६ ) वधूपरीक्षा, ( ७ ) सहचारिणी, ( ८ ) परिवर्तन, ( ९ ) जन्मरहस्य व ( १० ) शिवपावित्र्य.

## लघुकथा.

( १ ) गाणारें यंत्र, ( २ ) पती हाच स्त्रीचा अलंकार, ( ३ ) संपादिका व ( ४ ) गरीब बिचारें पाडस.

## कादंबऱ्या.

( १ ) श्यामसुंदर व ( २ ) दुटप्पी कीं दुहेरी.

## काव्य.

गीतोपायन.

## शास्त्रीय ग्रंथ.

भारतीय ज्योतिर्गणित.

## विनोदी लेख.

सुदाम्याचे पोहे अर्थात् साहित्यबत्तिशी.

---

# टीकात्मक व चर्चात्मक लेख.

( १ ) विक्रमशशिकला [ वि. वि. १८९३ एप्रिल ]
( २ ) शापसंभ्रम [ वि. वि. १८९४ मे–जून ]
( ३ ) पण लक्ष्यांत कोण घेतो ? [ वि. वि. १८९५ जाने–फेब्रु. ]
( ४ ) संगीत नाटकत्रय [ वि. वि. १८९८ एप्रिल ]
( ५ ) मुक्ता [ वि. वि. १८९८ जुलै ]
( ६ ) वीरतनयाची ढाल [ वि. वि. १८९८ आक्टोबर ते डिसेंबर ]
( ७ ) हिंदुधर्म आणि सुधारणा [ वि. वि. १८९९ एप्रिल–मे–जून ]
( ८ ) वामन दाजी ओक यांचें पुरुषभाषात्मक चरित्र, आणि वस्त्राच्छादन किंवा वस्त्रें [ वि. वि. १९०० मे ]

( ९ ) दोन समाजविषयक नाटकें [ वि. वि. १९०० सप्टेंबर–ऑक्टोबर ]
( १० ) माधवनिधन नाटक [ वि. वि. १९०० नव्हेंबर–डिसेंबर ]
( ११ ) मॅक्बेथ नाटकाचीं दोन भाषांतरें [ वि. वि. १९०१ नव्हेंबर ]
( १२ ) श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या उदार आश्रयाखालीं प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें [ वि. वि. १९०२ ऑगष्ट–सप्टेंबर ]
( १३ ) संगीत सौभद्र. [ वि. वि. १९०३ ऑगष्ट–सप्टेंबर ]
( १४ ) अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें चरित्र. [ वि. वि. १९०५ आगष्ट ]
( १५ ) सद्यःस्थितिदर्शक दोन नवीं नाटकें [वि.वि.१९०७-८ दिसेंबर-जानेवारी]
( १६ ) मराठी वाङ्मयांतील विशेष व त्यांचे उगम [ वि. वि. १९०९ नव्हेंबर ]
( १७ ) मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी [ वि. वि. १९१० नव्हेंबर–डिसेंबर ]
( १८ ) मराठी कथात्मक वाङ्मय [ वि. वि. १९१२ जानेवारी–फेब्रुवारी ]
( १९ ) महामाया व देवयानी अर्थात् विद्यासाधन [ वि. वि. १९१४ जानेवारी ]
( २० ) तुळसी रामायण [ वि. वि. १९१४ एप्रिल. ]
( २१ ) तोतयाचें बंड [ मासिक मनोरंजक, १९१४ जाने-फेब्रु-मार्च-मे-जून]
( २२ ) ग्रहगणित [ वि. वि. १९१५ मार्च ]
( २३ ) नक्षत्रविज्ञान [ वि. वि. १९१६ डिसेंबर ]
( २४ ) संगीत प्रेमाभास नाटक [ मासिक मनोरंजन, १९१७ जानेवारी ते मे ]
( २५ ) मराठी वाङ्मय व स्वावलंबन [ वि. वि. १९१७ एप्रील–मे ]
( २६ ) रागिणी व तिचीं भावंडें [ वि. वि. १९१८ मे जुलै ]
( २७ ) मराठी ग्रंथसंग्रह [ वि. वि. १९१८ डिसेंबर ]
( २८ ) तिसऱ्या ज्योतिष सम्मेलनांतील भाषण [ महाराष्ट्र साहित्य पत्रिका १९२० जून ]
( २९ ) पन्नास वर्षांपूर्वीचें व आतांचें महाराष्ट्र [ वि. वि. चा ज्युबिली ग्रंथ १९२१ ]
( ३० ) द्वितीय महाराष्ट्र कविसंमेलनांतील भाषण [ वि. वि. १९२२ जुलै ]

## किरकोळ लेख.

( ३१ ) ‘ नाटकांवरील टीकात्मक निबंध ’ याची प्रस्तावना
( ३२ ) ‘ नाटकविषयक व्यापक विचार ’ ,, ,,
( ३३ ) जातिभेदावरील मत ( मनोरंजन ) १९१२ डिसेंबर

( ३४ ) ' पुरुषांचें बंड ' याची प्रस्तावना
( ३५ ) सुभाषित चर्चा ( चंद्रिका १९१५ जुलै )
( ३६ ) विरहगीति या पुस्तकाची प्रस्तावना
( ३७ ) संगीत भाववंधन ,,
( ३८ ) हिंदुत्वाची व्याख्या ( कर्मयोगी अं. १, १९२० )
( ३९ ) नाटकांत स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच केल्या पाहिजेत काय ? ( रंगभूमि वर्ष ६, अंक ८, १९१६ )
( ४० ) कै. मित्रांच्या यशाचें रहस्य ( मित्र अंक, जुलै १९२१ )
( ४१ ) कै. मोरमकर ( १९२१ वि. वि. )
( ४२ ) बडोद्याच्या साहित्यसंमेलनास सूचना ( वि. वि. १९२१ जुलै )

REFBK-0003318

प्रकाशकः—वि. ग. ताम्हणकर, मॅनेजिंग डायरेक्टर यांनीं महाराष्ट्र पब्लिशिंग लिमिटेड, पुणें, करितां ८१५ सदाशिव पेठ येथें प्रसिद्ध केलें.

प्रिंटर—मंगेश नारायण कुळकर्णी, कर्नाटक प्रेस, ३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई.